# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com  E-Mail : prajasattaknews24@gmail.com  RNI No. - MAHMAR 2023/84526  Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.३० सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## तिरुपती मंदिर लाडू प्रसाद प्रकरण : देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा : सुप्रीम कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० नवी दिल्ली**

तिरुपती मंदिर लाडू प्रसाद प्रकरण आज सुप्रीम कोर्टाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहे. सुप्रीम कोर्टाने आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना खडेबोल सुनावले आहे. लाडू प्रसाद तपासाचा निकाल लागण्याआधीच माध्यमांमध्ये निवेदन देण्याची काय गरज होती ? असा प्रश्न कोर्टाने उपस्थित केला आहे. देवाला राजकारणापासून दूर ठेवलं पाहिजे असं मत कोर्टाने व्यक्त केलं आहे. अहवाल पाहता प्रथमदर्शनी असे दिसते की प्रसाद बनवताना भेसळयुक्त सामग्री वापरली गेली नव्हती. डखढ ने कुठपर्यंत तपास केला ? मुख्यमंत्र्यांनी यावर स्पष्टीकरण द्यावं असं ही कोर्टाने म्हटले आहे. संविधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीकडून जबाबदारीची अपेक्षा असते. अहवाल जुलैमध्ये आला मग सप्टेंबर महिन्यात त्यावर भाष्य का ? असा प्रश्न कोर्टाने उपस्थित केला आहे.

तुम्हीच अशी विधानं करत असाल तर मग तपासाची काय गरज ? असा सवाल कोर्टाने मुख्यमंत्र्यांना केला आहे. या प्रकरणाचा तपास राज्य सरकारने गठित केलेल्या डखढ मार्फत केला जाईल की अन्य दुसऱ्या एजन्सीकडे सोपवला जाईल. यावर कोर्ट गुरुवारी आपला आदेश देण्याची शक्यता आहे.



तिरुपती बालाजी प्रसाद प्रकरणी सोमवारी सुप्रीम कोर्टात आज सुनावणी झाली. प्रसादात प्राण्यांच्या चरबीची भेसळ केल्याच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे. न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. राज्य सरकारकडून वकील मुकुल रोहतगी बाजु माडतांना म्हणाले की, हे प्रकरण पूर्णपणे राजकीय आहे आणि स्वामी यांनी थेट राज्य सरकारला लक्ष्य करण्यासाठी ही याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांचे वकील पत्रकार सुरेश चव्हाण म्हणाले की, मी भक्त आहे, माझ्या भावना दुखावल्या आहेत. मी भावनांचे संरक्षण करण्याची मागणी करत आहे. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची माझी मागणी आहे. आंध्र प्रदेश सरकारचे वकील मुकुल रोहतगी म्हणाले की, या खऱ्या याचिका नाहीत.

**कोर्टाचे राज्य सरकारवर ताशेरे**

न्यायमूर्ती गवई यांनी विचारले की, तुमच्याकडे निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी काही साहित्य आहे का? आंध्र प्रदेश सरकारने सांगितले की आमच्याकडे लॅबचा अहवाल आहे. न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन म्हणाले की, अहवाल अजिबात स्पष्ट नाही. तपासाचे आदेश आधीच दिले असतील तर प्रेसमध्ये जाण्याची काय गरज होती? जुलैमध्ये अहवाल आला आणि सप्टेंबरमध्ये निवेदन आले. न्यायमूर्ती के.व्ही.विश्वनाथन म्हणाले की, हा अहवाल प्रथमदर्शनी सूचित करतो की तयारीसाठी वापरलेली सामग्री तेथे नाही.

न्यायमूर्ती गवई यांनी आंध्र प्रदेश सरकारला सांगितले की, तुम्ही धार्मिक भावनांचा आदर करणे आवश्यक आहे. न्यायमूर्ती विश्वनाथन म्हणाले की, लाडू बनवण्यासाठी हेच तूप वापरण्यात आले याचा पुरावा कुठे आहे? किती कंत्राटदार पुरवठा करत होते, मंजूर तूप मिसळले होते का, त्याचा वापर झाल्याचे कुठेही स्पष्ट झाले नाही. त्याची चाचणी केली गेली आहे आणि अहवाल सार्वजनिक डोमेनमध्ये ठेवण्यात आला आहे, चौकशी प्रलंबित आहे.

## विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारचा मोठा निर्णय; गायीला दिला 'राज्यमाते'चा दर्जा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री एकनात शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने गायीला 'राज्यमाता' घोषित केले आहे. या ऐतिहासिक पाऊलाबाबत सरकारने आदेशही जारी केला आहे. वैदिक काळापासून भारतीय संस्कृतीत गायीला महत्त्वाचे स्थान असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

सरकारने सांगितल्यानुसार, वैदिक काळापासून भारतीय संस्कृतीत गाईचे स्थान, मानवी आहारात गाईच्या दुधाची उपयुक्तता, आयुर्वेद औषध, पंचगव्य उपचार पद्धती आणि सेंद्रिय शेती पद्धतीमध्ये गायीचे शेण व गोमूत्राचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान, अशाप्रकारचा निर्णय घेणारे महाराष्ट्र दुसरे राज्य बनले आहे.

दरम्यान, सनातन धर्मात गायीला माता मानले जाते. तसेच या धर्मात गायीची पूजा केली जाते. हिंदू मान्यतेनुसार गाईंमध्ये देवदेवता वास करतात. गेल्या काही काळापासून अनेक हिंदू संघटनांकडून गायीला राज्याच्या मातेचा दर्जा देण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. हा सर्व विचार करुन आता सरकारने गायीला राज्य मातेचा दर्जा देण्याची घोषणा केली आहे.

## उद्धव ठाकरेंनी कोणत्याही मतदारसंघातून जिंकून दाखवावे, भाजप प्रदेशाध्यक्षांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चंद्रपूर**



अडीच वर्षाचा एकूणच कारभार बघता काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) मुख्यमंत्री पदासाठी उध्दव ठाकरे यांचा चेहरा मान्य करायला तयार नाहीत. त्यामुळे उध्दव ठाकरे वैफल्यग्रस्त झाले आहेत. त्यातूनच ते वायफळ बडबड करीत आहेत. देवेंद्र फडणवीस यांची जमानत जप्त करण्याची भाषा बोलणारे ठाकरे यांनी महाराष्ट्रातील कोणत्याही विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवून आमदार बनून दाखवावे व त्यानंतरच असे आरोप करावे असे थेट आवाहन भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे दोन दिवसाच्या चंद्रपूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. रविवारी राजुरा व चंद्रपूर विधानसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेतल्यानंतर ब्रम्हपुरी व चिमूरच्या दिशेने निघण्यापूर्वी स्थानिक हॉटेल एन. डी. येथे पत्रकार परिषद उध्दव ठाकरे यांच्यावर टीका केली. ठाकरे यांचा विदर्भ दौरा हा वैफल्यग्रस्ततेतून होता.

प्रखर हिंदुत्ववादी बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव ही एकमेव ओळख असलेल्या उध्दव ठाकरे यांनी काँग्रेसचे हिंदुत्व स्वीकारले आहे. त्यामुळेच शंभर कोटीच्या भ्रष्टाचारच्या आरोपात तुरुंगवास भोगावा लागलेल्या अनिल देशमुख व दीडशे कोटीच्या भ्रष्टाचारच्या आरोपात आमदारकी गमावलेल्यासुनील केदार यांची सोबत त्यांना करावी लागत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जमानत जप्त करण्याची भाषा बोलणाऱ्या ठाकरे यांनी पहिले महाराष्ट्रातून आमदारकी जिंकून दाखवावी व नंतर अशी भाषा बोलावी असेही बावनकुळे म्हणाले. ठाकरे यांनी निवडणूक जिंकली नाही, आमदार म्हणून निवडून आले नाही. मुख्यमंत्री म्हणूनही त्यांनी मागच्या दरवाज्याने आमदारकी मिळवली. याउलट देवेंद्र फडणवीस जननेते आहेत. हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्राचे वाघ होते. ते कर्तुत्ववान नेते होते व त्यांचे नेतृत्व प्रखर होते. हिंदू विचार महाराष्ट्राच्या प्रत्येकाच्या मनात जागवणारे बाळासाहेब ठाकरे याचे सुपुत्र उध्दव ठाकरे यांनी हिंदुत्व विचार संपविला आहे. त्यामुळेच त्यांना काँग्रेस सोबत जावे लागले आहे. याउलट बाळासाहेबांनी काँग्रेस सोबत जावे लागले तर राजकीय दुकान बंद करेल असे सांगितले होते. बँक घोटाळ्यात आरोपी असलेले व न्यायालयाच्या शिक्षेमुळे आमदारकी गेलेले काँग्रेस नेते सुनील केदार यांनी छत्रपति शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख करून महाराजांचा अपमान केला याविषयी नाराजी व्यक्त केली. ठाकरे निराशेतून कटोरा घेऊन काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे मागे दिल्लीत फिरत आहेत. या दोन्ही पक्षांनी त्यांना लोकसभेत खासदार दिले विधानसभेत तुम्हीच आमदारकी अशी म्हणण्याची वेळ ठाकरे यांच्यावर आली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व गृह मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वात राज्यात भाजपने शिवसेनेचे सर्वाधिक आमदार निवडून आणले.

## आरक्षण संपवण्यासाठी चार मुख्य पक्ष एकत्र; आंबेडकरांनी पडद्यामागचं राजकारण सांगितल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० जळगाव**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आहे. याच आरक्षणाच्या मुद्द्यावरून वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकरयांनी सत्ताधारी आणि विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. आरक्षण कायमचं संपलं पाहिजे, या मुद्द्यावर काँग्रेस, राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि भाजप हे चारही पक्ष एक आहेत, असा गंभीर आरोप आंबेडकरांनी केला. ते जळगाव येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.



विधानसभा निवडणुकीत ओबीसी आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरणार असून निवडणुका याच मुद्द्याभोवती फिरतील, अशी परिस्थिती निर्माण झाली. या मुद्द्यावरच निवडणुका लढवल्या जातील, असेही ते म्हणाले.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीकडे सरकारने लक्ष दिलं नाही, त्यामुळं तो प्रश्न अद्याप सुटू शकला नाही. आता आरक्षणाचा मुद्दा कळीचा मुद्दा बनला आहे. ओबीसी समाजातून आरक्षण द्यावं, अशी जरांगे पाटील यांची मागणी आहे. या मागणीवर राजकीय पक्षांनी कोणतीही भूमिका घेतलेली नाही. मात्र, मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण देऊ नये, अशी भूमिका ओबीसी समाजाने घेतली आहे. ओबीसींच्या भूमिकेला वंचित बहुजन आघाडीचा पूर्ण पाठिंबा आहे, असं त्यांनी म्हटलं.

## होमगार्डच्या भत्त्यात वाढ, कोतवालांच्या मानधनात वाढ, अनुकंपा धोरणही लागू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. एकीकडे विरोधक राज्यातील विविध विषयांवरून सरकारवर टीकेची झोड उठवत आहेत, तर दुसरीकडे महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर निर्णयाचा धडाका लावला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज (३० सप्टेंबर) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मंत्रिमंडळाची बैठक महत्त्वपूर्ण मानली जात होती. या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकार कोणते निर्णय घेणार? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.



आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध विषयांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यानंतर तब्बल ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये राज्यातील होमगार्ड यांच्या भत्त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा लाभ सुमारे ४० हजार होमगार्ड यांना होणार आहे, तसेच कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, तसेच अनुकंपा धोरणाही लागू करण्यात येणार, ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे. तसेच माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारने स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

## महाविकास आघाडीच्या जागांची अदला बदल होणार शरद पवारांनी दिले संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० पुणे**




विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सर्वच पक्षांकडून जोरदार हालचाली सुरु आहेत. एकीकडे महाविकास आघाडीच्या जागावाटपांसाठी बैठका सुरु आहेत तर दुसरीकडे महायुतीकडूनही जागावाटपाच्या बैठकीवर जोर देण्यात येत आहे. अशातच आता जागावाटपाबाबत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार (यांनी मोठं विधान केलंय. महाविकास आघाडीच्या जागांमध्ये अदला-बदल होणार असल्याचे संकेत शरद पवार यांनी दिले आहेत. त्यामुळे आता यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विद्यमान आमदारांना दुसऱ्या मतदारसंघातून निवडणूक लढवावी लागणार काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे. माध्यमांच्या प्रतिनिधींशी अनौपचारिकरित्या बातचीत करताना शरद पवारांनी हे संकेत दिले आहेत.

शरद पवार म्हणाले, राज्यात महाविकास आघाडीं सरकार आणणं हेच आमचं लक्ष्य आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांची निवडून येण्याची क्षमता आहे, अशा ठिकाणी जागांची अदला-बदल होऊ शकते, जेवढ्या जागा निवडून येण्याची शक्यता आहे, तेवढ्या जागा महाविकास आघाडीतील प्रत्येक पक्षाला दिल्या जाऊ शकतात, असं शरद पवार यांनी स्पष्ट केलंय.महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदाबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. मुख्यमंत्री पदाचा निर्णय हा आमदार निवडून आल्यानंतरच घेणार आहोत. मराठवाड्यातील काही जिल्ह्यात आरक्षणाचा संघर्ष वाढला असून मराठवाड्यातील हा वाद कसा मिटवता येईल हा आमचा प्रयत्न असल्याचंही शरद पवार यांनी सांगितलंय.

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचा निसर्गरम्य परिसर पाहून प्रभावित झालो : डॉ. कुमार विश्वास

### संस्थाअध्यक्ष मा .आ. प्रविण पोटे पाटील यांच्यावर कौतुकांचा वर्षाव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती**

डॉ. कुमार विश्वास यांचे पीआर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती मध्ये जेसीआय द्वारा आयोजित 'विश्वास की बात विश्वास के साथ ' या कार्यक्रमात संस्थाध्यक्ष मा .आ. प्रविण पोटे पाटील यांनी स्वागत केले.२०१९ मध्ये पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा आयोजित टेकलॉन्स या कार्यक्रमात डॉ कुमार विश्वास प्रमुख पाहुणे होते त्यांनी विद्यार्थ्यांना त्यावेळी मोलाचे मार्गदर्शन सुद्धा केले होते. आज पुन्हा पाच वर्षांनी, डॉ कुमार विश्वास यांचा 'विश्वास की बात विश्वास के साथ ' हा प्रोग्रॅम पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप च्या भव्य अश्या स्वामी विवेकानंद सभागृहात जेसीआय च्या वतीने आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील स्वच्छता , निसर्गरम्य परिसर , महाविद्यालयातील हिरवीगार झाडे, सुखसुविधा , नीटनेटकेपणा जश्याच्या तश्या पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा जोपासल्या गेल्याचे पाहून डॉ कुमार विश्वास खूप प्रभावित झाले व त्यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे तसेच संस्था अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील व सचिव श्रेयशदादा पोटे पाटील यांचे कौतुक केले.

## माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेंच्या कन्या संजना जाधव यांच्या गाडीला अपघात, थोडक्यात बचावल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०छत्रपती संभाजीनगर**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव यांच्या गाडीला अपघात झाला. सोमवारी (दि.३०) धुळे-सोलापूर महामार्गावरील चाळीसगाव तालुक्यात रांजणगाव येथे हा अपघात झाला. या अपघातातून संजना जाधव थोडक्यात बचावल्या आहेत. तर त्यांच्या गाडीचे नुकसान झालं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव या सोमवारी सकाळी आपले सहकारी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जयेश बोरसे, शेरोडी ग्रामपंचायतचे सरपंच ज्ञानेश्र्वर निकम, आदित्य गर्जे यांच्यासह गाडीतून कन्नड येथून नागद पट्ट्यातील बनोटी गावाकडे, गावभेट दौऱ्यानिमीत्त जात होत्या. यादरम्यान रांजणगाव फाट्याजवळ समोरुन येणारी पिकअपने चुकीच्या बाजूने भरधाव वेगाने येत संजना जाधव यांच्या गाडीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.



या अपघाताच्या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. अपघात घडल्यानंतर लगेच स्थानिकांनी बचावासाठी धाव घेतली. या अपघातात संजना जाधव आणि त्यांच्यासोबत गाडीत असलेले कार्यकर्ते थोडक्यात बचावले. तसेच, संजना जाधव यांच्या गाडीला धडक देणारा पिकअप चालक सुद्धा सुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात संजना जाधव यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क साधला असता, गाडीतील आम्ही सर्व जण सुखरूप आहोत, सुदैवाने कुणालाही दुखापत झाली नाही, असे त्यांनी सांगितले.

गुंतवणुकीसाठीचे अनुकूल धोरण, उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि मेक इन इंडिया यासारख्या उपक्रमांमुळे येत्या काही वर्षांत भारतात दरवर्षी १०० अब्ज डॉलर एफडीआय म्हणजेच परदेशी गुंतवणूक आकर्षित होईल, अशी माहिती केंद्रीय उद्योग आणि अंतर्गत प्रोत्साहन विभागाने दिली आहे. केंद्र सरकारने देशातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी संरक्षण, रेल्वे, विमा आणि दूरसंचार यासारख्या क्षेत्रांचे नियम सुलभ करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. काही क्षेत्रे वगळता बहुतांश क्षेत्रांमध्ये एफडीआयला विनाशर्त परवानगी आहे. गेल्या दहा वर्षांत विदेशांतून ६६७ अब्ज डॉलर इतका निधी भारतात आला. त्याआधीच्या दहा वर्षांत तो याच्या निम्म्यापेक्षाही कमी होता. तैवानमधील फॉक्सकॉन कंपनी भारतात सुमारे एक अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याचा विचार करत आहे. स्मार्ट फोन डिस्प्ले मोड्युल जोडणी प्रकल्प तामिळनाडूमध्ये उभारण्यासाठी तिच्यामार्फत गुंतवणूक केली जाऊ शकते. देशाच्या दृष्टीने या सर्व सुवार्ताच असून, त्यातच आता सोन्याच्या भावाने विक्रमी पातळी गाठली आहे. सोन्याचा भाव प्रतिग्रॅम ९० रुपयांनी वधारून तो ७७ हजार ८५० रुपयांवर पोहोचला आहे. याचवेळी चांदीचा भाव प्रतिकिलोला तीन हजारांची उसळी घेऊन ९३ हजारांवर गेला आहे. आता नवरात्र जवळ आले असून, विजयादशमीच्या मुहूर्तावर सर्वसामान्य लोक आणि खासकरून गृहिणी सोन्या-चांदीची खरेदी करतात

## संपादकीय ......

# सोन्या-चांदीला झळाळी

अथवा थेट सुवर्णालंकार घेण्यासाठी बाजारपेठेत गर्दी करतात.

ऑल इंडिया सराफ असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, जागतिक बाजारपेठेतील तेजीमुळे देशांतर्गत बाजारपेठेत सोन्या-चांदीचे भाव चढे आहेत. 'एमसीएक्स' या कमोडिटी बाजारावर सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅमला १.३३ टक्क्यांनी वाढून ७६ हजार ९५० रुपयांवर पोहोचला आहे. चांदीचा भाव प्रतिकिलोला ४१९ रुपये म्हणजेच सुमारे अर्धा टक्क्याने वाढून तो ९१ हजार ९७४ रुपयांवर गेला आहे. जागतिक धातू वायदे मंच 'कॉमेक्स'वर सोन्याचा भाव प्रतिअंस २,६८१ डॉलरवर जाऊन पोहोचला आहे. मुळात अमेरिकेतील व्याजदर कपातीमुळे व्यापार-उद्योग क्षेत्रात कमालीचा उत्साह निर्माण झाला आहे. भारतात सेन्सेक्स आणि निफ्टीचे उच्चांकी शिखर गाठले जात आहे. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे, इस्रायलने लेबनॉनवर तुफानी हल्ले सुरू केले आहेत. उद्या लेबनॉनकडून आणखी प्रतिहल्ले होऊ शकतात. वाढत्या भू-राजकीय तणावामुळे गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय असलेल्या सोन्याकडे गुंतवणूकदार अधिक आकर्षित होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे नजीकच्या काळात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्याचा भाव प्रतिअंस ३,२०० डॉलरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. सोन्याने वायदे बाजारात प्रतिदहा ग्रॅमला ७६ हजार रुपयांची पातळीही गाठली आहे. थोडक्यात, आगामी काळात सोन्याच्या भावातील तेजी कायम राहणार आहे. यंदाच्या वर्षात सोने आणि चांदी या दोन मालमत्ता अनपेक्षितपणे तेजीत आल्या. याचे कारण, रशिया-युक्रेन युद्ध आणि गाझापट्टीतील इस्रायलचे बॉम्ब हल्ले. ज्या ज्या वेळी युद्धे होतात, तेव्हा सोन्या-चांदीमध्ये लोक जास्त प्रमाणात गुंतवणूक करतात. शिवाय शेअर बाजारात मागच्या तीन महिन्यांत दोन वेळा फ्लॅश करेक्शन्स किंवा तीव्र घसरण झाली. मिड व स्मॉल कॅप प्रवर्गातील शेअर्सची जोरदार विक्री झाली. त्यामुळे अनेक गुंतवणूकदारांचे नुकसान झाले. अशावेळी लोक गुंतवणुकीचा पर्यायी मार्गही पसंत करतात, त्याचवेळी सोन्याने डॉलरच्या चलनात विक्रम केला आणि चांदीही ३० टक्क्यांहून अधिक वाढली होती.

अगदी मेअखेरीसही अशी स्थिती होती की, निफ्टी, सेन्सेक्स किंवा बँक निफ्टी या निर्देशांकांपेक्षा सोने-चांदी या धातूंनी जास्त परतावा दिला होता. म्हणजे गुंतवणूकदारांची चांदी झाली होती. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आपली संपत्ती बँक ठेवी, शेअर्स, म्युच्युअल फंड, जमीन आणि सोने-चांदीसारख्या कमोडिटी मार्केट अशा विविध ठिकाणी गुंतवली जाते. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत धक्कादायक निकाल लागल्यास शेअर बाजारात 'करेक्शन'येईल, अशी भीती यापूर्वीच होती. त्यामुळे या निवडणुकांचे निकाल येण्यापूर्वीच कमोडिटीचे आकर्षण वाढले होते. त्यात गेल्या आठवड्यात फेडरल रिझर्व्हने व्याजदर कपात केली; पण कपातीबाबतच्या या अपेक्षा मागील वर्ष-सव्वा वर्षे कमोडिटी बाजारात धमाल घडवून आणत होत्या. सोन्या-चांदीचे भाव भडकतात, तेव्हा आभूषणांचे म्हणून जे खरेदीदार असतात, त्यांच्या दृष्टीने खिशाला मोठीच कात्री लागते. उलट जे गुंतवणूक म्हणून सोन्या-चांदीकडे बघतात, त्यांना ती विक्रीची सुवर्णसंधी वाटते. सरकारचे सॉव्हरिन गोल्ड बाँडस् असून, त्यात प्रचंड संख्येत लोक गुंतवणूक करतात. आता तर रिझर्व्ह बँकेच्या ॲपवरून त्यात थेट गुंतवणूक करता येते. त्यामुळे भाव तेजीत असताना विक्रीची संधी मिळू शकते.

वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या माहितीनुसार उझबेकिस्तान आणि थायलंडने मे महिन्याच्या अगोदरच विक्रमी किमतीचा लाभ घेऊन सोने विक्री केली. उद्या जगातील युद्धजन्य स्थिती काबूत आली आणि भू-राजकीय स्थैर्य येऊ लागले, तर अन्य देशही सोने विक्री करण्याची शक्यता आहे. अशावेळी सोन्या-चांदीचे दर वेगाने घसरू शकतात. भारतात गेल्या आर्थिक वर्षात सलग एकूण ५,५०० कोटी रुपयांच्या 'गोल्ड ईटीएफ'च्या खरेदीनंतर एप्रिल २०२४ मध्ये ४४० कोटी रुपयांची ईटीएफ विक्री झाली. लहान गुंतवणूकदारांना सोन्याच्या तुलनेत चांदी कमी पैशात जास्त मिळत असल्यामुळे चांदी घेणे त्याला आवडते. भारत व अन्य विकसित

# पशुपालन करताय?

## पशुसंवर्धन विभागाच्या 'या' १० योजना तुमच्यासाठी!




**विदर्भ प्रजासत्ताक** – राज्यातील पशुपालनाच्या व्यवसायाला चालना मिळावी आणि जास्तीत जास्त शेतकरी पशुपालनाकडे वळून शेतीपूरक व्यवसाय वाढीस लागावा या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागाकडून विविध वैयक्तिक लाभाच्या योजना राबवण्यात येतात. त्यामध्ये शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना २० टक्क्यांपासून ८० टक्क्यांपर्यंतचे अनुदान देण्यात येते. यामध्ये कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, मुरघास निर्मिती अशा व्यवसायांचा सामावेश आहे.

दरम्यान, पशुसंवर्धन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना थेट गाई, म्हशी आणि शेळ्या-मेंढ्यांचे वाटप केले जाते. त्याबरोबरच गोठ्याची बांधणी करण्यासाठीसुद्धा योजना राबवल्या आहेत. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्ग तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील लाभार्थी भाग घेऊ शकतात.या योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे शेती असणे आवश्यक आहे. काही योजनांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने तर काही योजनांचे अर्ज ऑफलाईन पद्धतीने करता येतात. अशा योजनांचा लाभ घ्यायचा असेल तर पशुसंवर्धन विभागाच्या संकेतस्थळावर भेट द्यावी किंवा जवळील पशुवैद्यकीय दवाखान्यास भेट द्यावी.

### राबवण्यात येणाऱ्या योजना कोणत्या

१) २ दुधाळ संकरित किंवा देशी गायी किंवा म्हशींचे वाटप योजना.

२) अंशतः ठाणबद्ध पद्धतीने शेळी किंवा मेंढी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्याची योजना.

३) जिल्हास्तरीय १००० मांसल-कुक्कुटपालन पक्षी संगोपनाद्वारे व्यवसाय योजना.

४) एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम योजना.

५) शेतावर वैरण उत्पादनासाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना.

६) देशी गोवंशीच्या कालवडी, सुधारीत / देशी पारड्यांचीची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य योजना

७) मुरघास निर्मितीस प्रोत्साहन-सायलेज बॅग खरेदीस अनुदान योजना.

८) मुरघास वापरासाठी अनुदान योजना.

९) टिएमआर (टोटल मिक्स रॅशन) वापरासाठी प्रोत्साहनपर अनुदान योजना

१०) खनिज मिश्रण वापरासाठी अनुदान योजना.




## कितीही खाल्लं तरी शरीर हाडकुळं? रोज खा ४ पैकी १ पदार्थ; निरोगी वजन वाढवण्यासाठी सोपा उपाय

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

वजन वाढवणे किंवा कमी करणे या दोन्ही गोष्टी एकाच रात्री घडत नाही काहींच वजन झपाट्यानं वाढतं तर, काहींना कमी करताना नाकीनऊ येतात ढर्ळी). पण काहींचं खाऊनही वजन वाढत नाही. काही लोक वजन कमी होत नाही म्हणून प्रयत्न करतात तर काही जण वजन वाढत नाही म्हणून नाराज असतात.



वजन वाढत नसल्यामुळे बरेच टोमणेही ऐकावे लागतात. वजन वाढवण्यासाठी काही लोक प्रोटीनचे डब्बे संपवतात. पण तरीही वजन वाढत नाही. वजन जर खाऊनही वाढत नसेल तर, आहारात ५ सुपरफूडचा समावेश करून पाहा. हे पदार्थ खाल्ल्यानंतर शरीर बेढब नसून, फिट आणि सुडौल दिसेल. निरोगी पद्धतीने वजन वाढवण्यासाठी नेमके कोणते पदार्थ खावेत? पाहा

**कॅलरीयुक्त अन्न खा**

वजन वाढत नाही अशी काही जण तक्रार करतात. पण आपण किती आणि काय खात आहोत? यावर सगळ्या गोष्टी अवलंबून आहे. जर आपलं वजन वाढत नसेल तर, कॅलरीयुक्त पदार्थ खा. ज्या पदार्थांमध्ये कॅलरीजचे प्रमाण जास्त असेल, ते पदार्थ खा. यामुळे दिवसभर एनर्जी टिकून राहते आणि वजनही वाढवण्यास मदत होते. आपण दुग्धजन्य पदार्थ, दूध, दही, पनीर, चीज असे पदार्थ खाऊ शकता.

**छोट्या – छोट्या भागात अन्न विभागा**– वेट गेन आणि वेट लॉस या दोन्हींमध्ये फूड डिस्ट्रीब्यूशन फार महत्वाचं आहे. दिवसभरात आपण ३ वेळ अन्न खातो. पण ३ वेळेस अन्न न खाता, त्याची अधिक विभागणी करू शकता. प्री-ब्रेकफास्ट, सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, संध्याकाळचा नाश्ता, सूप आणि रात्रीचे जेवण यासारख्या लहान पार्टसमध्ये डिवाईड करा. यामुळे वेट गेनसाठी मदत होईल.

**केळी आणि दूध**– केळी आणि दुधात जास्त प्रमाणात कॅलरीज असतात, जे वजन वाढवण्यासाठी खूप फायदेशीर आहे. आपण सकाळी केळी आणि दूध पिऊ शकता. केळीचा शेक पिऊ शकता. यामुळे वेट गेनसाठी मदत होईल.

**प्रोटीन रिच पदार्थ**–आहारात प्रोटीन रिच पदार्थांचा समावेश करा. प्रोटीनयुक्त पदार्थ खाल्ल्याने वेट गेनसाठी मदत होते. शिवाय मसल्सही वाढतात. प्रोटीनरिच फूड खाल्ल्यानंतर व्यायामही करणे गरजेचं आहे.

# १३० दिवसांत तयार होणाऱ्या गव्हाच्या HD३४१० वाणाबद्दल माहितीय का? वाचा सविस्तर

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**– भारतीय कृषी संशोधन संस्था (ICAR) ने रब्बी हंगामासाठी गव्हाची पेरणी (Wheat Variety) करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी गहू कऊ३४१० ही सुधारित गव्हाची जात सादर केली आहे. हे वाण १३० दिवसांत तयार होणारे असून अनेक रोगांशी लढण्यास सक्षम असल्याचे समोर आले आहे. यंदाच्या रब्बी हंगामात ही गव्हाची शेतकऱ्यांसाठी उत्तम उत्पादन देणारी ठरणार आहे.

भारतीय कृषी संशोधन संस्था ने फेब्रुवारी २०२३ मध्ये गव्हाची HD3410 जात लाँच केली होती आणि नंतर केंद्राने पेरणीसाठी मान्यता दिली होती. गव्हाचा हा वाण रब्बी हंगामासाठी योग्य बागायत क्षेत्रात पेरणीसाठी योग्य असेल. कारण, ही वेगाने वाढणारी गव्हाची जात आहे. ही जात गहू पिकामुळे होणाऱ्या अनेक रोगांशी लढण्यास सक्षम आहे. त्यामुळे कमी खर्चात जास्त उत्पादनाचा लाभ शेतकऱ्याला मिळतो. गव्हाचा




कऊ३४१० वाण केवळ १३० दिवसांत परिपक्व होतो, तर इतर अनेक गव्हाच्या जाती जास्त वेळ घेतात.

**या राज्यांमध्ये पेरणी सल्ला**

ICAR दिल्लीच्या कृषी शास्त्रज्ञांनी उत्तर प्रदेश, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश या




राज्यांसह योग्य सिंचन क्षेत्रामध्ये HD३४१० या जातीची गहू पेरण्याचा सल्ला दिला आहे. गहू HD३४१० या जातीला कमी प्रमाणात पाणी लागते, परंतु सिंचनास उशीर होणे रोपासाठी हानिकारक ठरते. त्यामुळेच ज्या भागात कालवे, नद्या, तलाव किंवा कूपनलिका यांची उत्तम व्यवस्था आहे, अशा भागातील शेतकरी या जातीची पेरणी करून बंपर उत्पादन मिळवू शकतात. या जातीमध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने बाजारात त्याची मागणीही जास्त आहे. याशिवाय ही जात लवकर पेरणीसाठी उत्तम असल्याचे सांगितले जाते.

**अनेक रोगांशी लढण्याची क्षमता** –भारतीय कृषी संशोधन संस्था नुसार, गव्हाची ही जात अवघ्या १३० दिवसांत तयार होते. तर इतर गहू पिकांना १४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागतो. या जातीच्या झाडांची उंची कमी राहते. या जातीची वनस्पती १००-१०५ सेमी उंचीपर्यंत वाढते. लवकर परिपक्वता आणि अनेक रोगांशी लढण्याची क्षमता यामुळे ही जात शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय होत आहे. त्याच्या पिठापासून ब्रेड, बिस्किटे आणि चांगल्या प्रतीचे पीठ तयार केले जाते. त्यात प्रथिने, लोह आणि इतर पोषक घटक मुबलक प्रमाणात असल्याने बाजारात याला मोठी मागणी आहे.

# मोर्शी येथे स्वच्छताही सेवा उपक्रमात स्वच्छता दौड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती**– माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अमरावती क्षेत्रिय कार्यालय, मोर्शी नगर परिषद आणि मोर्शी उपविभागीय पोलिस अधीक्षक कार्यालयातर्फे स्वच्छता ही सेवा उपक्रम राबविण्यात आला.यात शनिवार, दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता मोर्शी येथील सिंभोरा चौकातून स्वच्छता दौड काढण्यात आली. स्वच्छता ब्रँड म्बेसेडर पूनम मोहोड यांच्या हस्ते स्वच्छता रनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी तहसिलदार राहुल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, मुख्याधिकारी पराग वानखडे उपस्थित होते.श्री. वानखडे यांनी, स्वच्छता ही सेवा पंधरवाड्यात निसर्ग स्वच्छता, संस्कार स्वच्छता या थीमवर स्वच्छता रॅली, वृक्षारोपण-एक पेड माँ के नाम, आरोग्य शिबिर, चित्रकला स्पर्धा, स्वच्छता व




आरोग्य या विषयावर वादविवाद स्पर्धा आदी कार्यक्रम घेण्यात आले. स्वच्छता कार्यक्रम देशभरात राबवले जात असून सिंभोरा चौकातून स्वच्छता दौड काढण्यात आली. स्वच्छता ब्रँड म्बेसेडर पूनम मोहोड यांच्या हस्ते स्वच्छता रनचे उद्घाटन करण्यात आले.विविध उपक्रमांच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला माहिती व प्रसारण मंत्रालय, अमरावती कार्यालयाचे शशिकांत पटेल, नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

### अमरावती महानगरपालिका पशुवैद्यकीय विभाग तसेच वसा निमल रेस्क्यू सेंटर यांचे संयुक्तीक उपक्रमाद्वारे

# जागतिक रेबिज दिन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

वसा निमल रेस्क्यु सेंटर व अमरावती महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागाचा संयुक्तीक उपक्रमाने वसा निमल सेंटर गौरक्षण संस्था येथे रेविज दिनानिमीत्त रेबिजमुक्त भारत अभियान राबविण्यात आले. सदर कार्यक्रमाकरीता अमरावती महानगरपालिकेचे डॉ. सचिन बोंद्रे ,पशुशल्यचिकीत्सक यांचे मार्गदर्शनाखाली रेबिज रोगाविषयी जनजागृती करणे व सदर रोगा विषयी संपुर्ण माहिती देण्यात आली व सदर सेंटर वरिल सर्व श्वानाला रेबिज लसिकरण करण्यात आले तसेच वसा निमल रेस्क्यु संस्थेचे अध्यक्ष श्री. शुभम सांयके यांनी अनाथ अपंग रोग ग्रस्त श्वानांवर तसेच प्राण्यांवर रेस्क्यु करुन सदर सेंटर वर ठेवुन प्राण्यांची औषधोपचार व खाण्याची व्यवस्थेबद्दल माहिती दिली.

दि. २८/९/२०२४ हा दिन जागतिक रेबिज दिन असल्यामुळे अमरावती महानगरपालिके मार्फत दि. २८/०९/२०२४ ते ०५/१०/२०२४पर्यंत विविध ठिकाणी रेबिज कॅम्प घेवुन शहरातील मोकाट श्वानाला व पाळीव श्वानाला रेबिज लसिकरण करण्यात येईल असे आवाहन डॉ. सचिन बोंद्रे,पशुशल्यचिकीत्सक, महानगरपालिका अमरावती यांनी केले.

सदर कार्यक्रमाकरीता वसा निमल रेस्क्यू सेंटर यांचे अध्यक्ष श्री. शुभम सांयके, उपाध्यक्ष श्री. निखील फुटाणे, सचिव श्री. गणेश अखते, व्हेटर्नरी सर्जन डॉ. सुमित वैद्य तसेच वसा ॲनिमल रेस्क्यु सेंटर चे सहाय्यक कर्मचारी श्री. ओम यावले, श्री. विक्की मालवे, श्री रुगवेद भैसे, श्री. सिध्दांत मेटे, श्री. पंकज मालवे,श्री. आर्यन जवंजाळ, श्री. राजेश्वर वंजारी, श्री. आदेश सावरकर, दामिनी गादगे (रिसेप्शनिस्ट), पुजा डाखोडे(वसा अकाउन्टट) सर्व कर्मचारी उपस्थित होते. अमरावती महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागाचे



श्री. गुणसागर गवई, (पशुधननिरीक्षक), डॉ. निलेश सोळंके (पशुधन निरीक्षक), श्री. पंकज कनेर (कनिष्ठ लिपीक), श्री. गिरीष चव्हाण (कनिष्ठ लिपीक), श्री. पंकज कल्याणकर(स्वास्थनिरीक्षक), सोनाली अहिर (संगणक चालक), श्री. चंद्रकांत बुंदेले (शिपाई) उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ३० सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# हिंदू को फ्लॉवर समझे क्या ? हिंदू समाज फायर है फायर...नितेश राणे



## अचलपूर धर्म जागरण सभेत नितेश राणे कडाडले

### सभेपुर्वी अचलपूर नाका परिसरातून शहरात निघाली भव्य रॅली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अचलपूर-** हिंदू समाजाच्या सणात आडवे येत असाल तर याद राखा. हिंदू समाजाच्या सणावरच दगडफेक का होते ? मात्र मुस्लिमांचे सण होत असताना कुठलाच वाद होत नाही. ही बाब खपवून घेतली जाणार नाही. आज जी अचलपूर शहरात दहशत निर्माण झाली. ती दहशत एक दिवस नव्हे ३६५ दिवस असायला हवी. हिंदूकडे वाकड्या नजरा करुन पाहणाऱ्यांचे थोबडा ओळखू यायला नको. आम्ही कोणाच्या नांदी लागत नाही, आमच्या नांदी लागाल तर याद राखा, असा इशारा भाजपचे आ. नितेश राणे यांनी दिला. अचलपूर येथे सकल हिंदू समाजाच्यावतीने हिंदू जनजागरण



सभेचे आयोजन करण्यात आले होते. यासभेत प्रमुख वक्ते भाजपचे आ. नितेश राणे यांनी आपल्या भाषणातून जोरदार प्रहार केले.

सभेपूर्वी अचलपूर-परतवाडा शहरात हिंदू समाज आक्रोश रॅली व सभेचे आयोजन यशस्वीरित्या झाले. शहरातील चांदूरबाजार नाक्यावर रॅलीत सहभागी होण्यासाठी हजारो युवक मोटरसायकलवर भगवे झेंडे घेत दुपारपासून एकत्रित येत होते. दुपारी ४ वाजताच्या सुमारास भाजप आमदार नितेश राणे यांचे आगमन होताचजय श्रीराम च्या घोषणा देत ही रॅली पोलिसांच्या बंदोबस्तात दिलेल्या मार्गाने अचलपूर शहरातून प्रारंभ होत परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक मार्गे परतवाडा शहरातून बाजार समितीच्या टिएमसी यार्डवरील कार्यक्रम स्थळी दाखल झाली. हजारो भगव्या पताका घेऊन उपस्थित असलेल्या हजारो युवकांनी जय श्रीरामाच्या उदघोषणा केल्या. याप्रसंगी नितेश राणे यांनी संबोधित करतांना म्हटले की, हिंदू सणासुदीच्या वेळेत केलेली मस्ती खपवून घेतली जाणार नाही. आम्हाला महाराष्ट्रात वादंग निर्माण करायचा नाही मात्र जिहादी विचाराचे काही लोक त्यांच्या रॅलीतून अतिरेक्यांचा जयजयकार करत असेल तर खपवून घेतले जाणार नाही, असा इशाराही नितेश राणे यांनी यासभेतून दिला. त्यांनी अकोला व अकोट येथील जल्लोषाचाही उल्लेख केला. या सभेला मोठ्या संख्येने तरुणांची उपस्थिती होती. पोलिसांच्या चोख बंदोबस्तात ही सभा व रॅली शांततेत पार पडली.या सभेलाडॉ. अनिल बोंडे, शक्ती फाउंडेशनचे ॲड. प्रमोद सिंह गड्रेल, शामसिंह गड्रेल, सागर वैद्य व आदी मान्यवर उपस्थित होते.नितेश राणे यांच्या बाजार समितीमधील कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात युवक, महिला-पुरूष उपस्थित होते. परंतु संपूर्ण कार्यक्रम शांततेत पार पडल्यामुळे पोलीस प्रशासनाने सुटकेचा श्वास घेतला.



### शहरातून भव्य बाईक रॅली

सभेच्या पूर्वी शहरातूल अचलपूर नाका ते माल्वेशपुरा, बियाबानी मार्ग ते पोलिस स्टेशन चौक ते टक्कर चौक, खिडकीगेटपासून कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीतील सहभागी तरुण वर्गासह सहभागी नागरिक हातात भगवे झेंडे घेवून जोरदार नारेबाजी, घोषणा बाजी करीत होते. रॅलीचे समापन झाल्यानंतर धर्मसभेचे आयोजन करण्यात आले.


### आक्षेपार्ह कमेंट करणाऱ्यांवर कारवाई

नितेश राणे यांची बाईक रॅली फेसबुक पेजवर लाईव्ह स्ट्रीम करण्यात आली. ज्यामध्ये काही लोकांनी एका विशिष्ट समाजावर आक्षेपार्ह कमेंट केल्या होत्या. ही बाब सायबर क्राईम पोलिसांच्या निदर्शनास आली आहे. त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. परतवाडा पोलिस ठाण्यात - गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याला प्रत्युत्तर म्हणून जर कुणी अशा आक्षेपार्ह पोस्ट टाकल्या तर त्यांच्यावर सुद्धा कारवाई करणात येईल, असा इशारा एका व्हीडीओच्या माध्यमातून एसपी विशाल आनंद यांनी दिला आहे.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या नेतृत्वाखाली अचलपूर परतवाडा जुळ्या शहरासह कृषी उत्पन्न बाजार मितीच्या परिसरात सुद्धा पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. अचलपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार गजानन मेहते, परतवाडा पोलीस स्टेशन चे संदीप चव्हाण व समरसपुरा पोलीस स्टेशन चे ठाणेदार यांच्यासह १५० अधिकारी, १२०० च्या वर पोलिस बंदोबस्तावर तैनात होते.

# मॅरेथॉन असोसिएशन द्वारा सातवी राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन ला प्रचंड प्रतिसाद







## चिमुकल्यांचा उत्साह, तरुणांचा जोश, वरिष्ठांचा सहभाग

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३०अमरावती** मॅरेथॉन असोसिएशन द्वारा आयोजित सातवी राज्यस्तरीय अमरावती हाफ मॅरेथॉन २९ सप्टेंबर २०२४ रोजी उत्साहाच्या वातावरणात पार पडली. चिमुकल्यांचा उत्साह व किलबिल, तरुणांचा जोष व वरिष्ठांच्या सक्रीय सहभागामुळे अतिशय उत्कंठापुर्वक वातावरण निर्माण झाले होते. विशेष म्हणजे अमरावती मधील नागरीकांचा सक्रीय सहभाग च स्पर्धेच्या मार्गावर ठिकठिकाणी स्पर्धकांना प्रोत्साहीत करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरीकांची उपस्थिती, प्रेरणावर्धक गाणे व संगीत यामुळे यावर्षीची मॅरेथॉन अविस्मरणीय ठरली.२९ किमी. अंतराची हाफ मॅरेथॉन सकाळी ६ वाजता वेळेवर सुरु झाली. विवांता ग्रुपचे संचालक प्रमोद राठोड, तापडिया सिटीसेंटरचे संचालक मधुर लढ्ढा, पोलीस उपायुक्त सागर पाटील, अमरावती महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे, गेल इंडियाचे स्वतंत्र संचालक रविद्र कोल्हे, आ. सुलभा खोडके, आमदार अमरावती, गेल इंडिया कंपनीचे चिफ जनरल मॅनेजर फनेंद्र महाजन, विजय संतान उप संचालक, गणेश जाधव जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी या स्पर्धेला हिरवी झेंडी दाखविल्यावर स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेचा मार्ग जिल्हा स्टेडियम-वेलकम पॉईंट बियाणी चौक मार्डी रोड मार्गे नेताजी कॉलनी परत विद्यापीठ परिसरातून मार्डी रोडवर परत बियाणी चौक, वेलकम पॉईट, परत बियाणी चौक, इर्विन चौक राजकमल उड्डान पुलावरुन राजापेठ पोलीस स्टेशन परत इर्विन चौक व जिल्हा स्टेडियम असा होता. १० किमी. स्पर्धा ६:१५ वाजता व ५ किमी. ची स्पर्धा ६:३० वाजता सुरु झाली. स्पर्धेच्या मार्गावर चार ठिकाणी एनर्जी स्थानक देण्यात आले होते. या ठिकाणी स्पर्धकांना पाणी, केळी व एनर्जी पेय उपलब्ध करुन देण्यात आले. स्पर्धेदरम्यान स्पर्धकांना काही इजा झाल्यास किवा इतर आपात परिस्थिती उद्भवल्यास ती हाताळण्याकरीता स्पर्धेच्या मार्गावर व जिल्हा स्टेडियम येथे रिम्स् हॉस्पीटलयेथीलतज डॉक्टरांची चमू उपलब्ध होती. रिम्स हॉस्पीटल, अमरावती यांचेकडून सर्व प्रकारचे वैद्रद्यकिय सहाय्यक व ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन देण्यात आले. १० किमी. व २१ किमी. मधील स्पर्धकांची अचूक वेळ नोंदविता यावी याकरीता त्यांच्या बिब मध्ये इलेक्ट्रॉनिक टायमिंग चिप बसविण्यात आल्या होत्या. स्पोर्टस टायमिग सोल्युशन इंडिया या कंपनीचे मुंबई येथील चमू याकामाकरीता येथे हजर होती. वेलकम पॉईंट, नेताजी कॉलनी, राजापेठ पोलीस स्टेशन या ठिकाणी सेंसर स्थानक उभारण्यात आले होते. स्पर्धे दरम्यान स्पर्धकांता मार्य दर्शविण्या करीता व वाहतूक नियंत्रण करण्याकरीता ६० शारिरीक शिक्षण शिक्षक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील एम.पी.एड. चे ३० विद्यार्थी व श्री शिवाजी सायन्स महाविद्यालयाचे ४० विद्यार्थ्यांनी रेस ऑफिशियल्स म्हणून काम केले.

# प्रमोद धुरंधर नॅशनल एज्युकेटर अवॉर्ड ने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती-** राष्ट्रीय स्तरावर आपल्या प्रतिभेच्या माध्यमातुन अनन्य साधारण कार्य करणाऱ्या पुरुष,महिला, व संस्था, पत्रकार लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते यांना तसेच विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती रेडियंट टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे त्यांच्या योगदान यासाठी सन्मानित केल्या जाते. यावर्षीचा हा पुरस्कार अमरावतीचे जनाई ग्रामीण बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रमोद धुरंधर यांना प्रदान करण्यात आला. त्यांना मिळालेल्या या पुसरस्काराने प्रमोद सरांचे सर्वच स्तरावरून अभिनंदन केल्या जात आहे.

जनाई ग्रामीण बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रमोद धुरंधर यांनी संस्थेच्या माध्यमातून मागील १६वर्षा पासून विविध प्रशिक्षण देत आहेत यामध्ये पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण बँक रेल्वे स्टाफ सेलेक्शन एलआयसी भरती पूर्व प्रशिक्षण खइझड भरती पूर्व प्रशिक्षण देत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल रेडियंट टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड यांनी घेतली व त्यांच्या यथोचित सन्मान करण्यात आला.

प्रमोद धुरंधर यांनी आतापर्यंत एकूण १६५० विविध प्रशिक्षण दिले असून २००० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे तसेच करोना काळात



अत्यावश्यक तसेच गरजूंना किराणा वाटप याची दखल घेऊन ीशवळरपीं बुक ऑफ रेकॉर्ड यांनी प्रमोद धुरंधर यांना नॅशनल एज्युकेटर अवॉर्ड २०२४ हा सन्मान आचार्य अत्रे सभागृह पुणे येथे शहीद भगतसिंह यांचे पुतणे, तसेच तानाजी मालुसरे यांचे वंशज गुरुतेज सिंग ब्रार शकील पटेल यांचे हस्थे २९ सप्टेंबर २०२४ ला संपन्न झाला.

# सिटीलॅंड, बिझीलॅंड मध्ये बालकामगारांचे शोषण

## भीम ब्रिगेडने केली बालकामगारांची सुटका, कामगार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यवाही



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० नांदगाव पेठ-** एशियामधील सर्वात मोठे कापड मार्केट असलेले सिटीलॅंड आणि बिझीलॅंड मध्ये अनेक बालकामगारांचा भरणा असून त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेत अत्यल्प वेतनावर अनेक दुकानांमध्ये बालकामगारांना कामावर ठेवल्याने शनिवारी सायंकाळी कामगार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भीम ब्रिगेडने दहा ते बारा बालकामगारांची मुक्तता केली.या प्रकारामुळे बाल न्याय हक्क संदर्भातील शासनाच्या नियमावलीला दुकानमालकांनी तिलांजली दिल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाहीची मागणी भीम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मोहोड यांनी यावेळी केली.

बिझिलॅंड आणि सिटीलॅंड मधील अनेक दुकानांमध्ये कायद्याचे उल्लंघन करत मालकांनी अत्यल्प वेतनावर बालकामगार कामावर ठेवल्याची माहिती भीम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मोहोड यांना मिळाली होती. प्रवीण मोहोड यांनी याबाबत कामगार आयुक्त व जिल्हा कामगार अधिकारी यांना लेखी तक्रार देऊन कार्यवाहीची मागणी केली होती.तरीसुद्धा कामगार आयुक्त व अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणाची दखल न घेतल्याने शनिवारी प्रवीण मोहोड, संस्थापक अध्यक्ष राजेश वानखडे व भीम ब्रिगेड च्या कार्यकर्त्यांनी अचानक सिटीलॅंड मधील समता क्रिएशन, माहेरा क्रिएशन, वानी , मन्नत , रोनक, डि.के कपडा प्रतिष्ठान याठिकाणी धाडी मारून काम करणाऱ्या बालकामगारांना बाहेर काढले व त्यांची मुक्तता केली. कामगार अधिकाऱ्यांनी यावेळी सर्वांचे आधार कार्ड तपासले असता सर्व मुले ही ११ ते १५ वयोगटातील असल्याचे सिद्ध झाले.घरची परिस्थिती हलाकीची असल्याने ही मुले कामाच्या शोधत दुकानात येतात मात्र त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेत अत्यल्प वेतनावर त्यांना कामावर ठेवण्यात येते व त्यांच्याकडून कठीण कामे करण्यात येते असा प्रकार याठिकाणी सुरू असल्याने भीम ब्रिगेडच्या वतीने ही कार्यवाही करण्यात आल्याची प्रतिक्रिया प्रवीण मोहोड यांनी यावेळी दिली.

### ठोस कार्यवाही नाही

या प्रकरणी दंडात्मक तथा कठोर शिक्षेची तरतूद असतांना कामगार अधिकाऱ्यांच्या वतीने केवळ थातुरमातुर कार्यवाही करण्यात आल्याचे बोलले जात आहे. पोलीस ठाण्यात सुद्धा याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार देण्यात आली नाही हे विशेष! त्यामुळे वरिष्ठ अधिकारी याप्रकरणी काय कार्यवाही करतात याकडे जिल्ह्याचे लक्ष लागलेले आहे.

# आदिवासींच्या यादीतून 'ओरॉन, धांगड' जमात वगळा!

## ट्रायबल फोरमची मागणी, राज्यपालांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**
महाराष्ट्रात अनुसूचित जमातीच्या यादीतील क्रमांक ३६ वर असलेली ओरॉन, धांगड जमात राज्यात अस्तित्वात नाही आणि धांगड जमात (धनगड) ही धनगर नसल्याचे वारंवार स्पष्ट झाल्यामुळे आदिवासींच्या यादीतून वगळण्यात यावे, अशी मागणी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे 'ट्रायबल फोरम' संघटनेने २८ सप्टेंबर रोजी केली आहे.'ओरॉन' ही देशातील प्रमुख जमात असून, तिची पोटजमात धांगड आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जमाती यादीत क्रमांक ३६ वर ओरॉन, धांगड जमात आहे. पण ही जमात राज्यात अस्तित्वात नाही. मात्र राज्यात धांगड या इंग्रजी शब्दाचा अनुवाद धनगड असा करून घेतला आहे, असा आरोप संघटनेने निवेदनातून केला आहे. अनुसूचित जमातीच्या सूचीतील धांगड (धनगड) हा शब्द धनगरच आहे, असा दावा धनगर समाज करत आहे. पण धनगर या जातीचा धांगड या जमातीशी तिळमात्रही संबंध नाही. तथापि, धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी कायद्याच्या विहित पद्धतीचा अवलंब करून 'धनगर' आणि 'धनगड' एकच आहेत, असा स्वतंत्र जीआर राज्य सरकार काढणार असल्याचा निर्णय १५ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. राज्य सरकारचा हा निर्णय घटनाबाह्य असून, केंद्र शासनाचे निकष, न्यायालयीन निर्णयाशी विसंगत आहे, असे निवेदनातून म्हटले आहे.

**सरकारने स्वतःचाच प्रस्ताव मागे घेतला–** राज्य सरकारने धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यासाठी १२ जून १९७९ रोजी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला होता. पण धनगर समाज आदिवासींचे निकष पूर्ण करू शकत नसल्यामुळे हा प्रस्ताव केंद्र सरकारने नाकारला आणि अखेर राज्य शासनाला धनगर आरक्षण प्रस्ताव १९८१ मध्ये मागे घ्यावा लागला. त्यामुळे समावेशासंदर्भात प्रश्नच निर्माण होत नाही.

### उच्च व सर्वोच्च न्यायालयानेही फेटाळले

– धनगरांना अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण मिळावे, यासाठी मुंबई उच्च न्यायालयात २०१८ मध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. धनगर आणि धनगड एक नसल्याचे सांगत उच्च न्यायालयाने १६ फेब्रुवारी २०२४ रोजी याचिका फेटाळून लावली आहे. या निर्णयाविरुद्ध धनगर समाजाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तीसुद्धा याचिका फेटाळून लावली आहे. घटनेचे अनुच्छेद ३४२ (२) नुसार संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज त्यातील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जनजातीच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा त्यामधून वगळता येईल. हा अधिकार राष्ट्रपती व संसदेचा आहे. राज्य सरकारने त्यांचा अधिकार हिरावून घेऊ नये, तो अबाधित ठेवावा.

– **दिनेश टेकाम,** जिल्हाध्यक्ष, ट्रायबल फोरम, अमरावती

# अमरावतीला आय. टी. स्थापन करणार

## उद्योगमंत्री उदय सामंतकिरण पातुरकर यांच्या संघर्षाला यश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
११मागील एक वर्षापासून अमरावती शहरामध्ये आय. टी. पार्क ची स्थापना व्हावी यासाठी किरण पातुरकर यांच्या नेतृत्वामध्ये एका कृती समितीची स्थापना करण्यात आली. या कृती समिती तर्फे वर्षभरापासून कार्यक्रम, उपक्रम व आंदोलन राबविण्यात आले.


गेल्या वर्षभरापासून मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री श्री उदय सामंत यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.२७ सप्टेंबर ला अमरावतीला महाराष्ट्राची उद्योग भरारी या कार्यक्रमासाठी मा. उद्योगमंत्री श्री उदय सामंत अमरावतीला आलेले असतांना पुन्हा एकदा चळीीळेप खढ पार्क अमरावती कृती समिती तर्फे किरण पातुरकर आणि टीमने उद्योगमंत्र्यांना निवेदन देवून अमरावतीला खढ पार्क ची किती गरज आहे याची चर्चा केली आणि आजच्या या कार्यक्रमातच खढ पार्क ची घोषणा करवी असा आग्रह किरण पातुरकरांनी धरला.

मा. उद्योगमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये सभेला संबोधित करीत असतांना अमरावतीला खढ पार्क देण्याची घोषणा केली आणि त्या दृष्टीक ने तनू तातडीने हालचाली कराव्यात असे निर्देश एम.आय.डी.सी. चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई तसेच मुख्य अभियंता नागपूर आणि विभागीय अधिकारी अमरावती यांना दिले. उद्योगमंत्र्यांनी अमरावतीला खढ पार्क देण्याची घोषणा केल्यावर उपस्थित जनतेने टाळ्यांचा कडकडाट करून घोषणेचे स्वागत केले. मेगा टेक्सटाईल पार्क, शासकीय मेडिकल कॉलेज च्या आंदोलनाच्या यशानंतर किरण पातुरकरांच्या खढ पार्क अमरावती या मागणीला ही यश प्राप्त झाले. पुन्हा एकदा अमरावती मध्ये किरण पातुरकरांच्या व्हिजन चे कौतुक होत असून किरण पातुरकरांसारख्या नेतृत्वाची अमरावती शहराला गरज आहे अशा प्रकारची चर्चा सर्वत्र होत आहे.

# उद्योगमंत्री सामंत आले विमानाने आणि गेले मोटारीने ...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत शुक्रवारी नागपूर, अमरावती दौरा आटोपून छत्रपती संभाजीनगरला जाण्यासाठी अमरावती येथील बेलोरा विमानतळावर पोहोचले, तेव्हा वैमानिकाने टेक ऑफ करण्यास नकार दिला. कारण नसताना नकार दिल्याने उद्योगमंत्र्यांना अखेर समृद्धी महामार्गाने मोटारीने संभाजीनगर गाठावे लागले. याप्रकरणी लोणी पोलिसांकडे तक्रार नोंदविली आहे.

उद्योगभरारी या कार्यक्रमासाठी उद्योगमंत्री नागपूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर होते. एकाच दिवशी तीन कार्यक्रम असल्याने मुंबईतील एका एअर कंपनीचे एअरक्रॉफ्ट नेमण्यात आले होते. दुपारी ४:३० वाजेच्या सुमारास ते अमरावती येथील बेलोरा विमानतळावर पोहोचले. सायंकाळी ६ वाजता छत्रपती संभाजीनगरला कार्यक्रम असल्याने ५ वाजता त्यांना



टेक ऑफ करायचे होते. मात्र, उद्योगमंत्री विमानात बसण्यासाठी जात असताना वैमानिक गगन अरोरा यांनी पूर्वसूचना न देता त्यांचे साहित्य विमानातून बाहेर काढले. आपल्याला छत्रपती संभाजीनगरला पोहोचणे आवश्यक असून, टेक ऑफ करा, अशी विनंती सामंत यांनी वैमानिकाला केली; परंतु काही नियम सांगत वैमानिकाने स्पष्ट नकार दिला. त्यानंतर सामंत यांनी थेट कंपनीच्या मालकाशी संपर्क केला. मात्र, त्यांनीही प्रतिसाद दिला नाही.




# तेली समाजाचा राज्यस्तरीय परिचय मेळावा

## समाजाने मेळाव्याच्या माध्यमातून संवाद साधावा

## माजी खासदार सुरेश वाघमारे यांचे आवाहन

### श्री संताजी समाज विकास संस्थेच्या उपक्रमाला उदंड प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–**
आजच्या या आधुनिक युगात समाज व कुटुंब विखुरले जात असून त्याचा परिणाम नवीन पिढीवर होत आहे. परंतु अशा मेळाव्याच्या माध्यमातून विचारांची व विवाह जुळण्याच्या संबंधांची आदान प्रदान होते आणि संवाद साधता येतो ,त्यामुळे अशा प्रकारचे परिचय मिळावे आयोजित करणे आवश्यक असून समाजाने अशा मेळाव्यांमधून एकत्र येत संवाद साधावा असे आवाहन तेली समाजाचे नेते व माजी खासदार सुरेश वाघमारे यांनी उपस्थित समाज बांधवांना केले. परिचय मेळाव्याचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.तेली समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि सामाजिक उपक्रम राबवित समाजपयोगी कार्यात अग्रेसर असलेल्या श्री संताजी समाज विकास संस्थेतर्फे अनेक उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमांचा एक भाग म्हणून आज रविवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी अमरावतीत सर्व शाखीय तेली समाजातील उपवर– वधू व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते . पंचवटी चौक स्थित पीडीएमसीच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल सभागृहात आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन २९ सप्टेंबर रोजी सकाळी तेली समाजाचे नेते व माजी खासदार सुरेश वाघमारे यांच्या हस्ते झाले. श्री संताजी समाज विकास संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय आसोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या राज्यस्तरीय मेळाव्यास नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर कन्हेरे , माजी आमदार राजू तिमांडे ,माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर अशोक डोंगरे , स्वागताध्यक्ष सुनील गुल्हाने, जना बँकेचे अधिकारी यतीन्द्र नाडकर्णी , दामोदरराव मोगरकर, समाज भूषण दिल्ली येथील लक्ष्मणराव शिरभाते चहा वाले , राहुल गुल्हाने ,प्रवीण राठोड कारंजा लाड ,गंगाधरराव आसोले ,श्रीरामपंत सुखसोहळे, पत्रकार संजय बनारसे ,आतिश शिरभाते ,विवेक गुल्हाने ,डॉ. प्रा .अजय गुल्हाने ,चंद्रशेखर पिंपळे ,डॉ. अरुणा गुल्हाने अविनाश टाके, अशोकराव हांडे ,शंकरराव श्रीराव, विनोदराव अजमिरे,संजय जावळे, हर्षल काळे, दत्तात्रय कपिले ,प्रभाकरराव सव्वालाखे ,संजय जीरापुरे ,किशोर गुल्हाने ,विलास मुडे, दिलीपराव बिजवे ,अरुण गुल्हाने , गजाननराव राजगुरे आदी मान्यवर उपस्थित होते.सर्वप्रथम उपस्थित उपवर मुला मुलींच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत तेली समाजाचे आराध्य दैवत श्री संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर श्री संताजी समाज विकास संस्थेतर्फे उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.मेळाव्यास मार्गदर्शन करताना सुरेश वाघमारे म्हणाले की खरा संस्कार हा समाजातून मिळतो परंतु आज समाज प्रगती करीत असला तरी संवाद कमी झाला आहे अशी खंत व्यक्त करीत भविष्यातील चांगल्या वाटचालीसाठी प्रत्येकाने संवाद साधावा असा सल्ला त्यांनी दिला. माजी महापौर विलास इंगोले यांनी श्री संताजी समाज विकास संस्था राबवित असलेल्या विविध उपक्रमांची प्रशंसा करीत संस्थेच्या पुढील उपक्रमांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली. मेळाव्याचे आयोजक व अध्यक्ष तसेच श्री संताजी समाज विकास संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय आसोले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून संस्थेच्या भविष्यातील वाटचालीविषयी माहिती देत ध्येयधोरणे ठरवीत संस्था वाटचाल करीत असल्याचे सांगितले. संस्थेने आयोजित केलेला हा चौदावा मेळावा असून कोणताही आर्थिक सोर्स नसताना केवळ समाज बांधवांच्या मदतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. आगामी काळात समाजासाठीठोस असे कार्य करणार असल्याची ग्वाही प्राध्यापक संजय आसोले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली .यावेळी मार्गदर्शन करताना माजी आमदार राजीव तिमांडे म्हणाले की आज पूर्वीप्रमाणे परिस्थिती राहिली नसून समाज विखुरलेला आहे, पण विखुरलेल्या समाजाला एकत्र आणण्यासाठी असा मेळावा आयोजित केला याचा आपणास अभिमान असल्याचे सांगून संस्थेने संताजी महाराजांचे स्मारक, वसतिगृह ,अभ्यासिका अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्या अशी अपेक्षा देखील याप्रसंगी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय रायकर यांनी तर संचालन प्रा. डॉ. अनुप शिरभाते, सौ स्वाती जयसिंगपूरे ,सौ मनीषाताई गुल्हाने यांनी केले .या मेळाव्यास गोवा ,मध्य प्रदेश ,गुजरात ,छत्तीसगड तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विलास शिरभाते, मिलिंद शिरभाते, मधुकरराव शिंदे, संजय रायकर, ऍड चारुदत्त गुल्हाने, राजीव बनारसे, गजानन झोपाटे ,आशिष आगरकर, प्रा. सुनील जयसिंगपूरे, अतुल बिजवे, किशोर श्रीराव, अविनाश राजगुरे ,सुनील पचगाडे, नंदू रावेकर यांनी परिश्रम घेतले.

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा अमरावती दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती,**
राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन गुरूवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.दौऱ्यानुसार, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे गुरूवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी चार वाजता वर्धा येथून अमरावती येथील शासकीय विश्रामगृह आगमन होईल. त्यानंतर सायंकाळी चार ते सहा वाजेपर्यंत विविध घटकांशी भेटी घेऊन चर्चा करतील. त्यांचा



गुरूवारी अमरावती येथे मुक्काम राहणार आहे.शुक्रवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता विश्रामृगह येथून हेलिपॅड कडे प्रयाण करतील. त्यानंतर सकाळी ९.४० वाजता अमरावती हेलीपॅड येथून शासकीय हेलीकॉप्टरने वाशिम कडे प्रयाण करतील.

# महाराष्ट्र वैश्य सोनार समाज भवन येथे भूमिपूजन संपन्न


## मा.आ. प्रविण पोटे पाटील यांच्या निधीअंतर्गत विकास होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** महाराष्ट्र वैश्य सोनर समाजाच्या वतीने प्रविण पोटे पाटील यांचा सत्कारमाजी राज्यमंत्री , माजी पालकमंत्री भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या निधी अंतर्गत न्यू गणेश कॉलोनी प्रभाग क्रमांक १७ मधील महाराष्ट्र वैश्य सोनार समाज भवन करिता भरीव निधी देण्यात आला. या निधी अंतर्गत समाज भवनाचे वॉटर



प्रुफिंग करणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच इतर कामे करण्यात येणार असून याचे भूमिपूजन मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.समाजातील लोकांनी एकोपा जोपासत समाजपयोगी कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रम करत जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी संवाद साधताना प्रविण पोटे पाटील यांनी केले तसेच यापुढेही विकास कामांकरिता मदत करण्याचे आश्वासन प्रविण पोटे पाटील यांनी दिले.समाज भवनाच्या विकासाकरिता भरीव निधी दिल्याबद्दल महाराष्ट्र वैश्य सोनार समाजाच्या वतीने मा. आ. प्रविण पोटे पाटील यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी तुषार भारतीय, चेतन गावंडे, दीपक पोहेकर यांच्यासह सचिन रासने, इंदुताई खारकर, सुनंदाताई खरड , नीलेश काजे , मिलिंद बांबल , लाविना हर्षे, स्वाती कुळकर्णी व नागरिक उपस्थित होते.

# अक्षय शिंदे याचा मृतदेह पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात दफन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० ठाणे** :बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा मृतदेह उल्हासनगर येथील शांतीनगर स्मशानभूमीत दफन करण्यात आला. अक्षय याला दफन करण्यास शिवसेना शिंदे गट आणि स्थानिकांनी विरोध केला होता. तसेच दफनासाठी खोदण्यात आलेला खड्डा देखील बुजविण्यात आला होता. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी बळाचा वापर करत स्थानिकांना स्मशानभूमी परिसरातून बाजूला केले. त्यानंतर त्याचा मृतदेह दफन करण्यात आला. बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणाती आरोपी अक्षय शिंदे याला ठाणे पोलिसांनी चकमकीमध्ये ठार केले होते. मुंबईतील जे.जे. रुग्णालयात त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह कळवा येथील ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील शवागृहात ठेवण्यात आला होता. त्याचा मृतदेह दफन करण्यासाठी नातेवाईक जागेचा शोध घेत होते.

परंतु मृतदेह दफन करण्यास स्थानिक नागरिक आणि राजकीय पक्षांनी विरोध केला होता. त्यामुळे अक्षयचा मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळत नसल्याचा दावा करत त्याच्या वडिलांनी शुक्रवारी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मृतदेह दफन करण्यासाठी निर्जन जागा शोधण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते.

# बंगाली मिठाईचा बाजारात गोडवा; मलाई चम चम, रसगुल्ला, राजभोज केशर मलाईला पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती**

नवरात्रोत्सवासाठी मुंबईतील सर्व मिठाईची दुकाने सज्ज झाली आहेत. या काळात स्वादिष्ट मिठाईला मागणी असते. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही बाजारात बंगाली मिठाईचे नवनवीन प्रकार आणण्याची तयारी व्यावसायिकांनी केली आहे.



दरवर्षी नवरात्रीच्या काळात देवीसमोर मिठाईचा नैवेद्य दाखवला जातो. अनेक ठिकाणी नऊ दिवस दरदिवशी विविध प्रकारची मिठाई दाखवली जाते. दर्शनासाठी येणारे आप्तस्वकीय आणि मित्र परिवाराचे तोंड गोड करण्यासाठी अनेक जण मिठाई घेऊन जातात. यंदाही मिठाईची मागणी अधिक राहण्याची आशा व्यावसायिकांना आहे. पुढील आठवडाभर ही मागणी चांगली राहते. त्यानुसार आम्ही तयारी केली आहे, अशी माहिती मिठाई व्यावसायिकाने दिली.

बाजारात यंदाही मलाई सँडविच, मलाई चम चम, केशर वाटी, मलाई चणा टोस्ट, खीर कोडम, राजभोज केशर मलाई, विविध प्रकारचे रसगुल्ले, केशर रसमलाई आदी बंगाली मिठाईला मागणी राहण्याची अपेक्षा व्यावसायिकांकडून व्यक्त केली जात आहे. या स्वादिष्ट मिठाईसोबत मिठाईचे आणखीही नवनवीन प्रकार बाजारात दाखल होण्याची शक्यता आहे.

# 'पूर्वप्राथमिक'साठी राज्याचे धोरण तयार; पुढील शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० पुणे**

राज्यातील पूर्वप्राथमिक वर्गातील वय ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या शिक्षणासंदर्भात राज्य शासनाने धोरण तयार केले आहे. पूर्वप्राथमिक वर्गासाठीचा अभ्यासक्रम तयार झाला असून, पुस्तकांची छपाई पूर्ण केली आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. पूर्वप्राथमिक वर्गांसाठी किती शैक्षणिक शुल्क आकारावे; तसेच या शाळांमध्ये काय सोयी-सुविधा असाव्यात, याबाबत समिती स्थापन केली असून, अहवाल प्राप्त झाल्याचे त्यांनी सांगितले.



**शाळांवर नियमन राहणार**

राज्यात पूर्वप्राथमिक शाळांवर शिक्षण तसेच महिला व बालकल्याण या दोन्ही विभागांचे नियंत्रण नाही. त्यामुळे नर्सरी शाळांचे पेव फुटले आहे. या शाळांमध्ये मनमानी शुल्क आकारले जाते; सोयी-सुविधा दिल्या जात नाहीत. त्या पार्श्वभूमीवर शाळांवर नियमन करण्यासाठी धोरण तयार केले आहे.

**राज्य अभ्यासक्रम आराखडा अंतिम**

तिसरी ते बारावी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी मसुदा प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यावर सुमारे चार हजार तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याचे तज्ज्ञ समितीकडून खंडन करण्यात आले. पराज्य अभ्यासक्रम आराखडा अंतिम केला आहे. पुस्तके तयार करण्यात येतील आणि पुढील शैक्षणिक वर्षांपासून त्याची राज्यात अंमलबजावणी केली जाणार आहे.

# कथ्थक, लावणी सादर; क्ले आर्ट, शास्त्रीय गायनाने वाढवली रंगत : युवा महोत्सव

## तिसऱ्या दिवशी विविध कला गुणांचे दर्शन, आज होणार समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अकोला**


संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात गेल्या तीन दिवसांपासून विद्यापीठाचा छात्र तरंग' युवा महोत्सव रंगला आहे. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी या महोत्सवात विविध कलांचे रंग भरले. सोमवारी, ३० सप्टेंबर रोजी या महोत्सवाचा समारोप होणार आहे.



शास्त्रीय नृत्यात प्रामुख्याने कथ्थक आणि ओडिसी नृत्य सादर करण्यात आली. नृत्य स्पर्धेमध्ये वाशीम आणि बुलडाणा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य आणि आदिवासी नृत्य सादर केली. लोकनृत्यात जागरण, आराधी, खंडोबा, गोंधळ व विविध आदिवासी नृत्यांचा समावेश होता. चिकट कला अंतर्गत विद्यार्थ्यांनी निसर्ग, फेस मास, निमल अशा पद्धतीचे वेगवेगळ्या प्रकारची कलाकृती सादर केली. फोटोग्राफी अंतर्गत ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर ऑन द स्पॉट पेंटिंग, तसेच पोस्टर मेकिंग स्पर्धेमध्ये पाणी वाचवा जीवन वाचवा , आर्टिफिशियल इंटेलिजन्स, व्यसनांच्या विळख्यात तरुण या विषयावरची विविध वास्तववादी चित्रे विद्यार्थ्यांनी रेखाटली. याशिवाय व्यंगचित्रांमधून सध्या चालू असलेल्या विविध घडामोडींवर मार्मिक भाष्य करण्यात आले. माती कलेअंतर्गत मुला-मुलींनी आपल्या कलेची चुणूक दाखवली.

वादविवाद स्पर्धेत अमरावती ग्रामीण व शहर यातील महाविद्यालयांनी सहभागी सहभाग नोंदवला. यामध्ये परिवारो मे घटती नैतिक शिक्षाही समाज मे बढते दुष्कर्म का कारण है? या विषयावर विरोधी व बाजूने विद्यार्थ्यांनी मते व्यक्त केली. एकांकिका स्पर्धेत अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, स्त्री सक्षमीकरण, व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी एकांकिका सादर केल्या. मूकनाट्य व प्रहसन या दोन स्पर्धांमध्ये विविध विषयांवर प्रकाश टाकण्यात आला. समूहगान स्पर्धेमध्ये अमरावती ग्रामीण व शहर अशा दोन्ही परिसरातील १७४ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. वक्तृत्व स्पर्धेमध्ये अमरावती ग्रामीण व शहर जिल्ह्यातील ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.

# कौंडण्यपूर शेत शिवारात बिबट्याचा धुमाकूळ : पाच जनावरे केले फस्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०कुऱ्हा फोटो बिबट**

कौंडण्यपूर शेत शिवारात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याने चांगलीच दहशत घातली असून जवळपास पाच ते सहा जनावरांचा जीव घेतला आहे.

भरदिवसा या बिबट्याकडून होत असलेल्याया जीव घेण्या हल्ल्याने गावकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याने केलेल्या हल्ल्यामध्ये शेतकऱ्यांचे जनावरे मरण पावल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असून या संदर्भात चांदुर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी यांना माहिती. वनविभागाने लवकरात लवकरया बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# कृऊबासचा भाजी, फळ बाजार चिखलमुक्त होणार

## अमरावतीच्या आमसभेचा ठराव मंजूर : सभापती हरिश मोरे यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळे आणि भाजी बाजाराला चिखलमुक्त करण्याच्यादृष्टीने प्रयत्न सुरु झाले आहेत. शनिवारी पार पडलेल्या आमसभेत या विषयावर शिक्कामोर्तब झाले. येत्या काळात लवकरच आराखडा तयार करुन प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केली जाईल, असे सभापती हरिश मोरे यांनी सांगितले.



जुना कॉटन मार्केट या नावाने असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जुन्या इमारतीत फळे व भाजीबाजार भरवला जातो. अमरावती जिल्हाच नव्हे तर शेजारचे काही जिल्हे आणि दूरवरुन या ठिकाणी भाजीपाला व फळे विक्रीसाठी येतात. परंतु अपुऱ्या सोयी-सुविधा असल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांत याठिकाणी चिखल साचतो. त्यामुळे घाणेरडा वास सहन करीत ग्राहकांना चिखलातून वाट काढावी लागते. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी, अडते, हमाल, मापारी, ग्राहक आणि व्यवसायिक हा त्रास सहन करित आहेत.

कृऊबास प्रशासनाला यासंदर्भात वेळोवेळी माहितीही देण्यात येऊन दुरुस्तीची मागणीही करण्यात आली. परंतु अद्यापही तसा मुहूर्त निघाला नाही. दरम्यान शनिवारी आमसभेत पुन्हा या विषयाने डोके वर काढले. उपस्थित सदस्यांनी याबाबत सविस्तर मांडणी केली. त्यामुळे संचालक मंडळाने हा विषय मान्य केला असून फळे व भाजीबाजाराला चिखलमुक्त करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. त्यामुळे येत्या काळात सदर कामाचा रितसर आराखडा तयार करुन पुढच्या पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे.

सदर बांधकाम करण्यासाठी भाजी व फळे विक्रेत्यांना काही काळापुरती पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. त्यासाठी बडनेरा येथील उपबाजार आणि आजू-बाजूच्या परिसरातील जीनांचे मालक यांच्याशी बोलणी सुरु करण्यात आली आहे, असेही मोरे यांनी सांगितले.

# चिखलदरा येथे ग्राम न्यायालयाचे थाटात उद्घाटन

## आदिवासी बांधवांना न्यायदानात सुलभता : दर शुक्रवारी चिखलदरा चालणार न्यायालय : नागपूर हायकोर्ट न्यायाधीशयांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चिखलदरा**

मेळघाट हा परिसर आदिवासी बहुल असून चिखलदरा तालुक्यातील आदिवासी बांधवांना आतापर्यंत न्याय मिळवण्यासाठी अचलपूर येथे जावे लागत होते. त्यामुळे आदिवासी बांधवांचा व स्थानिक नागरिकांचा त्यामुळे बराच वेळ वाया जायचा. त्यासोबतचआर्थिक फटका सुद्धा बसायचा. परंतु आताप्रथमच चिखलदरा सुद्धा न्यायालय सुरू झाले असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती विनय जोशी यांच्या हस्ते चिखलदरा न्यायालयाचे उद्घाटन करण्यात आले.

आता चिखलदरा न्यायालयामुळे तालुक्यातील नागरिकांना न्याय हक्कासाठी होणारी पायपीट थांबणार आहे. कोर्टात येणाऱ्या नागरिकाचे इतरही तालुक्याच्या काम या ठिकाणी होणार आहेत. त्यामुळेया भागातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना आहे. रविवारला या ठिकाणी न्यायालयाचे उद्घाटन करण्यात आले. माननीय न्यायमूर्ती विनय जोशी उच्च न्यायालय मुंबई यांच्या शुभहस्ते न्यायालयाचे उद्घाटन करण्यात आलेया कार्यक्रमात प्रामुख्याने सुधाकर यारलगड्डा प्रमुखजिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच ॲड. रवींद्र गोरले अध्यक्ष तालुका वकील संघ , अचलपूर सुकृत म्हातारमारे न्यायाधीश ग्राम न्यायालय चिखलदरा हे प्रामुख्याने उपस्थित होते. यासह न्यायाधीश आर. डी. चौगुले, श्रीमती एस. पी. भोर, एस. एन.पाटील, पी.



आर. गुप्ता, आर बी. वेहपाढे तसेच ॲड. सुशील नांदेकर, ॲड. नितीन चौधरी, विजय गोडबोले, संतोष बोरेकर, दिलीप खेरडे, विजयराव गाठे अथहर इकबाल खान, आशिष बदरके इत्यादी वकील प्रामुख्याने उपस्थित होते.

न्यायमूर्ती विनय जोशी बोलताना म्हणाले की, न्याय आपल्या दारी ग्राम न्यायालय ही संकल्पना २००८ पासून राबविण्यात येत आहे. नागरिकांना न्याय लवकर मिळावा, या उद्देशाने प्रत्येक नागरिकाला न्याय खर्चिक न होता लवकर न्याय मिळावेया उद्देशाने हे न्यायालय सुरू करण्यात आले. आदिवासी नागरिकांना न्यायदान सुलभतेने मिळावे यासाठी दर शुक्रवारी हे न्यायालय ठिकाणी चालवल्याजाणार आहे. दिवाणी व फौजदारी खटले या ठिकाणी चालणार आहेत. काही दिवसानंतर या ठिकाणी कायम स्वरूपीन्यायालय सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी आमचा प्रयत्न राहील असे न्यायमूर्ती विनय जोशी म्हणाले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात वकील नागरिक पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते अधिकारी चिखलदरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जीवन भिलावेकर चिखलदराचे तहसीलदार जीवन मोरणकर तसेच सर्वच विभागाचे अधिकारी या ठिकाणी उपस्थित होते.

**न्यायदानाला गती मिळणार**

चिखलदरा न्यायालयाची मागणी २००८ पासूनप्रलंबितहोती. परंतुकृषी जागा उपलब्ध झाली नव्हती. परंतु आता जागा उपलब्ध झाली आहे. लोकांच्या दारी न्याय शासनाची व नाही यंत्रणेची संकल्पना होती. यातून मेळघाटातील आदिवासी गोरगरीब जनतेसाठीहे ग्राम न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. त्यामुळे लोकांना जो विलंब न्याय मिळण्यासाठी लागत होता तो इथे विशेष न्यायालय सुरू झाल्यामुळे न्यायदानाला या ठिकाणी आता गती येईल व आदिवासी लोकांना या ठिकाणी न्याय मिळेल अशी प्रतिक्रिया ॲड. रवींद्र गोरले अध्यक्ष अचलपूर वकील संघ यांनी बोलताना सांगितले.

# माया नगर आरोग्य वर्धनी केंद्रात महिला व बाल रोग निदान शिबिर संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमरावती शहरातील हमालपुरा आरोग्य केंद्राच्या डॉ मानसी मुरके व डॉ वैशाली मोटघरे यांच्या वतीने महिला व बाल रोग निदान शिबिर आयोजन करण्यात आले होते हे शिबिर अमरावती शहराचे आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला ह्या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ रुपेश खडसे शहर साथ रोग नियंत्रण



अधिकारी ,प्रमुख पाहुणे म्हणून डॉ अतिश पवार दंत शल्य चिकित्सक , डॉ कौस्तुभ देशमुख बाल रोग तज्ञ , डॉ ओम पडघम वैद्यकीय अधिकारी, डॉ अनुराग खापरी मनोविकार तज्ञ, डॉ माधुरी भट्टड स्त्री रोग तज्ञ ,डॉ नवरे मॅडम , डॉ मनोज पाटील , चेंडेके सर, कृष्णा भाऊ वाघमारे औषध निर्माण अधिकारी, किन्हिकर सर प्रफुल गवई , श्रेयस नाडे उपस्थित होते ह्या रोग निदान शिबिरात दंत तपासणी, महिलांच्या आरोग्य तपासणी , मनोविकार तपासणी, क्षय रोग तपासणी, सिकल सेल तपासणी , ब्लड प्रेशर , शुगर तपासणी , त्वचा रोग तपासणी अश्या विविध प्रकराच्या मोफत तपासण्या करून औषध उपचार देण्यात आला व मोफत मर्दशन सुद्धा करण्यात आले ह्या शिबिरात गोपाल नगर व सर्व सूतगिरणी परिसरातील शेकडो महिला व बाल गोपाल यांनी लाभ घेतला ह्या शिबिरात डॉ मानसी मुरके यांनी महिलांना व बाल गोपल यांना आजाराबाबत मार्गदर्शन केले तसेच डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांनी सुद्धा डेंग्यू , मलेरिया , चिकन गुणिया व स्वच्छता , राखून प्रतिबंधात्मक उपाय योजणे बाबत माहिती देऊन परिसर स्वच्छ सुंदर ठेवण्यास जनतेला विनंती केले आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक बबन खंडारे बहुउद्देशीय आरोग्य सेवक यांनी केले हे शिबिर यशस्वी होण्यासाठी आशा वर्कर , आरोग्य सेविका व सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांनी मदत करून जनतेला शिबिराचा लाभ मिळून दिला.

# सणासुदीच्या दिवसात साखर वाढविणार गोडवा

## रेशनधारकांना मिळणार तीन किलो साखर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

सहा महिन्यांपासून रेशन दुकानातून अंत्योदय कार्डधारकांना साखर मिळाली नाही. आता एप्रिलपासूनचा कोटा ऑक्टोबर महिन्यात एकाचवेळी मिळणार असल्याने साखरेचा गोडवा वाढणार आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीत फक्त अंत्योदय रेशनधारकांना प्रतिमहिना एक किलो साखर २० रुपये या सवलतीच्या दरात दिली जाते. यंदा जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांची साखर मिळाली, त्यानंतर सहा पहिल्यापासून रेशन दुकानात सादर आनंदाचा शिधा



देण्यात येणार होता. त्यामध्ये एक किलो साखर मिळणार आहे. मात्र ही किट देखील अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील १.२८ लाख अंत्योदय कुटुंबात नाराजीचा सूर आहे. आता एप्रिल ते जून महिन्यातील २८ लाख कुटुंबांना प्रत्येकी तीन किलो याप्रमाणे ३,८४,०८१ किलो साखरेचे वाटप होणार आहे. काही जिल्ह्यात या साखरेचा पुरवठा होऊन वाटप सुरू झालेले आहे. मात्र अमरावती - जिल्ह्यात अद्याप साखरेचा पुरवठाझालेला नाही. मात्र, पुढील आठवड्यात होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात अंत्योदय कुटुंबांना सवलतीच्या दरात प्रत्येकी तीन किलो साखर मिळण्याची शक्यता असल्याने नवरात्री अन् दसरा गोड होणार आहे.

**अंत्योदयचे लाभार्थी**

अचलपूर तालुक्यातील ६५४०, अमरावती ५८६४, अमरावती, एफडीओ ७९५६, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ६१७०, चांदूर बाजार ८३०९, चांदूर रेल्वे ४२८०, चिखलदरा २०४८४, दर्यापूर ६३८०, धामणगाव ५३९१, धारणी २६०९०, मोर्शी ८०७९, नांदगाव खंडेश्वर ५२३२, भातकुली ४६६३, तिवसा ४३८३ व वरुड तालुक्यातील ८२१६ अंत्योदय कार्ड धारक कुटुंबांना प्रत्येकी तीन किलो साखरेचा लाभ मिळणार आहे.

# शहरात मंगळसूत्र चोरटे सक्रिय चार तासात चार महिलांचे मंगळसूत्र हिसकले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

शहरात शनिवारी सायंकाळी साडेसहा ते रात्री साडेदहाच्या सुमारास चार ठिकाणी चार महिलांचे मंगळसूत्र हिसकण्याचा चोरट्यांनी प्रयत्न केला. यावेळी एका महिलेचे मंगळसूत्र हिसकले तर दुसऱ्या महिलेचे अर्धवट मंगळसूत्र चोरट्याच्या हाती लागले. तसेच गाडगेनगर हद्दीतील राधानगर भागातून एका महिलेचे २१ हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र चोरटे घेऊन पसार झाले. तर चौथा प्रयत्न फसला आहे.



शहरातील श्री समर्थ हायस्कूल परिसरातील मार्गाने एक महिलापायी जात होती. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेचे मंगळसूत्र हिसकावून नेले. मात्र ते सोन्याचे नव्हते. तसेच दुसरी घटना फरशी स्टॉप भागात घडली. त्या ठिकाणी चोरट्याने महिलेच्या गळ्यात असलेले मंगळसूत्र ओढताच महिलेने मंगळसूत्र पकडून ठेवले. त्यावेळी मंगळसुत्राचा काही भाग चोरट्याच्या हातात गेला. तिसरा प्रयत्न बडनेरा हद्दीतील चंदन नगर भागात झाला. तसेच चौथी घटना शनिवारी रात्री सव्वा दहा वाजता राधानगर भागात घडली आहे. या प्रकरणी महिलेने पोलिसांत तक्रार दिली आहे. गाडगेनगर पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरुद्ध वाटमारीचा गुन्हा दाखल केला आहे.

# स्फूर्ती आणि विजयाचं प्रतीक म्हणजे तुतारी : प्रा.डॉ.हेमंत देशमुख

## शुभम वाघमारे प्रथम पुरस्काराचे मानकरी : अचलपूरचे प्रवीण थोरात यांना द्वितीय तर विनायक वाळके यांना तृतीय पुरस्कार : ऐतिहासिक ठरली तुतारी वादन स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि ३०अमरावती**

केवळ सण आणि उत्सवातच तुतारीचा वापर होत असला तरी तुतारी हे वाद्य शौर्याचं,आनंदाचं तसेच ते स्फूर्तीचं आणि विजयाचं देखील प्रतीक असल्याचं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी केले.जाधव पॅलेस नवाथे चौक अमरावती येथे पार पडलेल्या पहिल्या व ऐतिहासिक अशा तुतारी वादन या अभिनव स्पर्धेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून माजी उच्च शिक्षण सहसंचालक तथा संगीत तज्ञ डॉ.भोजराज चौधरी यांची उपस्थिती होती. अमरावतीत पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या या आगळ्यावेगळ्या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील तुतारी वादन करणाऱ्या कलावंतांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.




या स्पर्धेत शुभम वाघमारे हे प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले.त्यांना सात हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक अचलपूरचे प्रवीण थोरात यांना रोख पाच हजार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर विनायक वाळके यांना रोख रक्कम तीन हजार,सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये अजय खडसे व विजय वाकोडे यांना प्रोत्साहन पारितोषिक प्राप्त झाले. यावेळी पुढे बोलताना प्रा.हेमंत देशमुख यांनी आयोजना मागची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, व्यवसायाला चालना मिळावी व या क्षेत्रात काम करणाऱ्या कलावंतांना देखील व्यासपीठ मिळावं तसेच लुप्त पावत चाललेली ही कला पुन्हा व्यापक व्हावी,असे मत व्यक्त करून या कलेला खूप मोठा ऐतिहासिक वारसा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.तुतारी स्पर्धेत सहभागी झालेले सर्वश्री अर्जुन गोळे, लखन थोरात, शंकरराव वाघमारे, रामेश्वर इंगोले, जगदीश कलाने, सुधाकर खडसे, किशनराव हिवराळे, गजानन खडसे, सुधाकर लोंढे, प्रकाश अंभोरे, सौरभ माने, शाम खंडारे, गणेश गुगलमाने, दत्ता कलाने, नितीन थोरात, वासुदेव वाघमारे आदी कलावंताच्या सादरीकरणामुळे त्यांचादेखील मान्यवरांनी सन्मान केला. उल्लेखनीय म्हणजे ज्येष्ठ तुतारी वादक अंबादासजी खंडारे यांचा नवीन तुतारी, शाल,श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला सय्यद मन्सूर,रोशन कडू, डॉ.दीपक देशमुख,सतीश चरपे,विशाल बोरखेडे,वर्षाताई भटकर, मोमीन माजीद,मंगेश भटकर, वर्षाताई गतफने, डॉ.रोशन अर्डक,वेदांत उगले, गौरव वाटणे,राहुल चौधरी, कृष्णराव चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.स्पर्धेचे परीक्षण डॉ.भोजराज चौधरी व प्रा. डॉ.अतुल पाटील यांनी केले संचालन वैभव निमकर यांनी तर आभार प्रदर्शन शंतनु कणसे यांनी केले.

**हा कलावंतांचा सन्मान**

या तुतारी स्पर्धेचा जिल्ह्याच्या गौरवशाली इतिहासामध्ये नोंद होईल. शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम तुतारीचा सन्मान केला. प्रा. हेमंत देशमुख यांनी केवळ स्पर्धा आयोजित केली नाही तर लोककलावंतांचा सन्मान केला. राजाश्रेया शिवाय कला जिवंत राहू शकत नाही .कोणताही शुभ कार्यप्रसंगी तुतारीचा मान हा मोठा असतो मात्र गेल्या काही वर्षापासून तुतारी व तुतारी वाजवणारे कलावंत संपणार की काय अशी भीती होती. मात्र अशा प्रकारच्या स्पर्धेमुळे ही कला निश्चितच जिवंत राहील व नवनवीन कलावंत निर्माण होतील असे मत संगीत तज्ञ डॉ.भोजराज चौधरी यांनी व्यक्त केले.


# जिल्ह्यात नवरात्रोत्सवात दहा दिवसांची जय्यत तयारी नवमी, विजयादशमी एकाच दिवशी


## अंबादेवी व एकवीरा देवी मध्ये तयारी अंतिम टप्प्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

या वर्षीच्या नवरात्र महोत्सवाची अमरावती जिल्ह्यात जय्यत तयारी सुरू झाली आहे. यंदा नऊऐवजी दहा दिवस मातेची पूजाअर्चा होणार आहे. यंदा तृतीय तिथीमध्ये वृद्धी झाली आहे. तसेच नवमीची पूजा आणि विजयादशमी एकाच दिवशी साजरी केली जाणार आहे. नवरात्रोत्सवाला गुरुवारपासून (दि. ३) प्रारंभ होणार आहे. अश्विन शुक्ल पक्षाच्या प्रतिपदेपासून सुरू झालेला नवरात्रोत्सव १२ ऑक्टोबरपर्यंत असणार आहे.

अमरवतीच्याअंबादेवी व् एकवीरा देवी मध्ये ही तयारी अंतिम टप्यात ाली आहे.नवरात्रोत्सवात घराघरांत सुख- समृद्धी आणि वैभववृद्धी होऊन रोग पीडाही नाहीशी होण्याची शक्यता असते. तृतीय तिथीमध्ये वृद्धी झाली आहे. या तिथीला पुरातन काळापासून श्रेष्ठ मानले जाते. यावेळी ५ व ६ ऑक्टोबरला तृतीय तिथी आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाचा समारोप १२ ऑक्टोबरला होणार आहे. याच दिवशी विजयादशमीही साजरी केली जाणार आहे. तृतीय तिथी ५ ऑक्टोबरला पहाटे साडेपाच वाजता सुरू होऊन ६ ऑक्टोबरला सकाळी साडेसात वाजेपर्यंत असणार आहे. ही तिथी दोन. दिवस सूर्योदयाला स्पर्श करणार आहे. त्यामुळे दोन्ही दिवस तृतीय तिथीची पूजा केली जाणार आहे.





**कुळाचार, कुळधर्माप्रमाणे घटस्थापना**

कोणतीही नवरात्र ही साधारणपणे नऊ दिवसांची असते, पण तिथीचा क्षय झाल्याने ती आठ दिवसांची किया वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. यंदाचा नव- रात्रोत्सव दहा दिवसांचा असल्याचे म्हटले जात आहे. ३ ऑक्टोबर रोजी अश्विन मासारंभ होत असून, याच दिवशी घटस्थापना केल्यानंतर शारदीय नवरात्रारंभ होत आहे.

**सकाळी नवमीची पूजा, सायंकाळी शस्त्रपूजा**

नवरात्रोत्सवात नवमी तिथी १२ ऑक्टोबरला दुपारी १२:०७ मिनिटांनी येईल. ती १२ ऑक्टोबरला सकाळी १०:५९ मिनिटांपर्यंत असणार आहे. यानंतर दशमी तिथी येणार आहे. त्यामुळे १२ ऑक्टोबरला सकाळी नवमीची पूजा होऊन नवरात्रोत्सवाचा समारोपही याच दिवशी होणार आहे. यानंतर विजयादशमीचा सण साजरा केला जाणार आहे.यासोबतच शस्त्रपूजा होऊन रात्री रावणाचे दहन केले जाईल.




# पावसाळा संपला; पाच टक्क्यांची तूट : उद्यापासून पडणारा पावसाची अवकाळी मध्ये होणार नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

पावसाला हा १ जून ते ३० सप्टेंबरदरम्यान गृहीत धरला जातो. किंबहुना शासनाचे १४ ही तालुक्यांमधील आपत्ती निवारण केंद्र २४ बाय ७ या दरम्यान सुरू राहतात. आता मात्र यात शिथिलता येणार आहे. 'महावेध' द्वारा रोजच्या पावसाची आकडेवारी, जलसंपदा विभागाद्वारा रोजचा पाणीसाठा आता नियमित दिला जाणार नाही. शिवाय शासनाच्या लेखी १ ऑक्टोबरपासून पडणारा पाऊस हा मान्सूनचा नव्हे तर अवकाळी गृहीत धरण्यात येणार आहे. जिल्हात १ जून ते २९ सप्टेंबर या कालावधीत जिल्ह्यात सरासरी ८५६.९ मिमी पाऊस अपेक्षित असला तरी प्रत्यक्षात ८१९ मिमी पावसाची नोंद झालेली आहे. ही ९५.६ टक्केवारी आहे. गतवर्षी याच कालावधीत ५९०.६ मिमी पावसाची नोंद झाली होती. ही ६८.९ टक्केवारी होती. यावर्षीचा पावसाळा ३० सप्टेंबरला संपत आहे. त्यानंतर १ ऑक्टोबरपासून होणाऱ्या परतीच्या पावसाची शासन दप्तरी नोंद अवकाळी राहणार आहे,जिल्ह्यात १ जूनपासून पावसाळ्याला सुरुवात होत असते. त्यापूर्वी मे महिन्यापासून जिल्हा प्रशासनाची तयारी सुरू असते. मान्सून पूर्वतयारीचा जिल्हा व विभागस्तरावर आढावा घेतला जातो तसेच तालुकास्तरावर १४, जिल्ह्याचा व विभागाचा प्रत्येकी एक असे १६ नियंत्रण कक्ष १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत २४ बाय ७ सुरू असतात. यामध्ये पावसाळ्याच्या कालावधी पश्चात शिथिलता येते.

यंदा मात्र सध्या परतीचा पाऊस होत आहे. त्यामुळे तालुक्यांचे नियंत्रण कक्ष दसऱ्यापर्यंत सुरुच राहणार' असल्याची माहिती आहे.



### नऊ तालुक्यांत सरासरी पार, पाचमध्ये तूट

यंदाच्या पावसाळ्यात सरासरीच्या १२९ टक्के पाऊस हा चांदूर बाजार तालुक्यात झालेला आहे. गतवर्षी अंजनगाव सुर्जी व दर्यापूर तालुक्यांत सर्वाधिक कमी पाऊस झाला होता. यावर्षी दर्यापूर तालुक्यात सरासरीच्या १२५.७ टक्के व अंजनगाव सुर्जी तालुक्यात १२७.८ टक्के पाऊस झाला. सोबतच चिखलदरा तालुक्यात १०४.६, नांदगाव खंडेश्वर ११९.५. चांदूर रेल्वे ११६.६, तिवसा ११३.९, मोर्शी १०३.८, वरूड १०८.६ तालुक्यात झाला. उर्वरित पाच तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस झालेला आहे.

१ जून ते ३० सप्टेंबर दरम्यान पावसाळा गृहीत धरण्यात येतो. त्यानंतरच्या पावसाची अवकाळी पाऊस म्हणून नोंद होते. पावसाळ्याच्या काळात सुरु करण्यात आलेल्या तालुका नियंत्रण कक्षात यानंतर थोडी शिथिलता येते.

**– अनिल भटकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सीईओ, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**

# जेसीआय अमरावती गोल्डनतर्फे 'विश्वास की बात'

## जिकडे तिकडे एकात्म शौर्य, राष्ट्रीय शौर्य दिसत नाही : डॉ. कुमार विश्वास यांची खंत





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

महाराष्ट्राने शौर्याची नवी संकल्पना लिहिली आहे. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज भलेही आपआपसात लढतील, पण ते नेहमीच दिल्लीच्या विरोधात राहतील. आजच्या काळात 'भरोसा' आणि विश्वासाचे संकट आहे. आजच्या काळात प्रगतीचे अंदाज निरनिराळे आहेत, पण विचारात अंधार आहे पण रस्त्यांवर प्रकाश आहे... आज जिकडे पाहावेतिकडे एकात्म शौर्य दिसून येते. राष्ट्रीय शौर्य दिसत नाही. राष्ट्रीय मूल्ये कुठेतरी हरवली आहेत, अशी खंत डॉ. कुमार विश्वास यांनी व्यक्त केली. ते कर्करोग ग्रस्तांच्या मदतीसाठी जेसीआय अमरावती गोल्डन तर्फे कठोरा मार्गावर असलेल्या पीआर पोटे पाटील महाविद्यालय परिसरात असलेल्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित 'विश्वास की बात' या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठांवर प.पू. करंजेकरबाबा, माजी पालकमंत्री तथा आमदार प्रवीण पोटे, जेसीआयचे सर्वेक्षक रविशंकर, जेसीआय इंडिया झोन १३ चे अध्यक्ष नरेंद्र बर्दिया, माजी पालकमंत्री डॉ. सुनिल देशमुख, सामाजिक कार्यकर्ते दिलीप पोपट, तापडिया सिटी सेंटरचे संचालक मधुर लड्डा, प्रतिदिन अखबार वृत्तपत्राचे संपादक प्रवीण आहुजा आदी उपस्थित होते. मंचावर, दीपक राठी, जेपीएस समूहाचे संचालक जुगलकिशोर गट्टानी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार-मंत्री हर्षवर्धन देशमुख, डॉ. रविकांत कोल्हे, प्रतिक शारदा, गौरी अंगद देशमुख, अमित आरोकर, आनंद अमरावती, जे.सी.आय. निसीआय अमरावती गोल्डनचे अध्यक्ष रणजित पावडे, जेसीआय अमरावती गोल्डनचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम झंवर, आनंद राठी, सारंग राऊत, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, श्रीकृष्ण टोंगसे यांना व्यासपीठावर आदरपूर्वक आमंत्रित करण्यात आले होते.

डॉ. कुमार विश्वास यांनी त्यांच्या ओळखीच्या शैलीत बोलायला सुरुवात करताच प्रेक्षकांनी खचाखच भरलेला सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला होता. अंबा- एकविरा मातेच्या अंबानगरी पावन भूमीत आल्याने मी धन्य झालो आहे. महाराष्ट्र हे नेहमीच देशाच्या सत्तेचे केंद्र राहिले आहे. मी मराठी भाषेपासून, खूप प्रेरित आणि प्रभावित आहे. मी नेहमीच माझे लक्ष मराठी साहित्यावर केंद्रित केले आहे आणि त्यात उज्ज्वल भविष्य आणि अमृततुल्य साहित्य पाहिले आहे. मी नेहमी मराठी कवितांचे हिंदीत रूपांतर करून त्यांचा सराव करतो. महाराष्ट्राच्या राजकारणात यापूर्वी जे काही वारे वाहत आहेत, ते देशासमोर उदाहरण म्हणून पुढे आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.अमरावतीचे सभागृह माझ्या कल्पनेपेक्षाही सुंदर आहे. आता दिल्लीत सभामंडप बांधला गेला आहे, पण हे सभागृह त्याहूनही सुंदर आहे असे मी नक्कीच म्हणू शकतो. दिल्ली ते महाराष्ट्र आणि महाराष्ट्रात अमरावती येण्याचा प्रवास त्यांनी आपल्या काव्यात्मक शैलीत यावेळी वर्णन केला.




सर्वप्रथम जेसीआयच्या सर्व माजी अध्यक्षांनी प्रमुख पाहुणे व वक्ते डॉ. कुमार विश्वास यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर जेसीआय अमरावती गोल्डनच्या वतीने गुजरातमधील आनंद येथील रहिवासी आशिष मनवाड यांनी बनवलेला कुमार विश्वास यांचे तैलचित्र त्यांना भेट देण्यात आला. यानंतर जेसीआय गोल्डनचे अध्यक्ष रणजित पावडे, डॉ झंवर, अमित गिल्डा, नम्रता पावडे, सारंग राऊत, चितन पासड, अभिजीत काळबांडे, प्रमोद करवा, अमोल ठाकरे, चंद्रकांत ताथोड, सुनील जैस्वाल,सह सर्व सहकारी यांनी मंचावर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व शाल देत स्वागत केले.

जेसीआय गोल्डनचे अध्यक्ष रणजित पावडे यांनी प्रास्ताविक केले. जेसीआय अमरावती गोल्डनच्या वतीने आजचा 'विश्वास की बात विश्वास' हा कार्यक्रम आमच्या संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षातील एक महत्त्वाचा उपक्रम आहे. यावेळी त्यांनी जेसीआयचा इतिहास सर्वांसमोर मांडला. जेसीआय इंडिया ही संस्था जगातील १२२ देशांमध्ये कार्यरत आहे ज्यांचे प्रशिक्षण हा तिचा आत्मा आहे. व्यक्तिमत्व विकास आणि नेतृत्व या क्षेत्रात ही संस्था विशेषतः अग्रेसर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# अमरावती जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा, अचलपूर आणि अंजनगाव सूर्जी तालुक्यातील अनेक भागांत आज दुपारी दीड वाजताच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अनेक गावांमध्ये भूकंपाचे हादरे बसले. यामुळे काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते.चिखलदरा तालुक्यातील खटकाली हे गाव भूकंपाचे केंद्रस्थान आहे.

मेळघाटचा काही भाग, आमझरी, सातपुड्याच्या पायथ्याचा भाग, चिखलदरा, धारणी तालुक्यातील अनेक भागांत हे भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.२ इतकी नोंदवण्यात आल्याची माहिती आहे. जिल्हा प्रशासनाकडून अद्याप यासंदर्भात अधिकृत माहिती देण्यात आली नसली, तरी अनेक गावांमध्ये या भूकंपाचे हादरे जाणवल्याची माहिती गावकऱ्यांनी दिले आहे. भूकंपामुळे हानी झाल्याचे वृत्त अद्याप हाती आलेले नाही.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी हि जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती दिली असून कुठेही जीवित हानी किंवा नुकसान झाले नसल्याचे सांगितले .





सध्या स्थितीत कोणत्याही तालुक्यात घर कोसळले, घराला भेगा पडणे, जमिनीला भेगा अशा प्रकारे कुठेही निर्दशनास आले नाही. या भूकंपाच्या सौम्य झटक्याची जाणीव सातपुडा पर्वत रांगेलगतच्या धारणी, चिखलदरा, अंजनगाव सूर्जी, अचलपूर या चार तालुक्यांना बसल्याची माहिती आहे.

# तलवारीने केक कापाल तर वाढदिवस पोलिस कोठडीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

तलवार, खंजीरने केक कापून वाढदिवस साजरा करणारे कमी नाहीत. मात्र, तलवारीने केक कापून वाढदिवस साजरा करताना आढळून आल्यास थेट गुन्हा दाखल केला जात आहे. त्यामुळे वाढदिवस साजरा करताना काळजी घ्यावी लागणार आहे, अन्यथा पोलिस कोठडीतच वाढदिवस साजरा करावा लागू शकतो. अमरावती जिल्ह्यात अवैध व्यवसायाविरुद्ध कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. सराईत गुन्हेगारांचीही तपासणी केली जात आहे. यामुळे गुन्हेगारीला लगाम बसण्यास मदत झाली आहे. अनेक गुन्हेगारांनी आपला उपद्रव थांबविला आहे, तर काहींनी जिल्ह्यातून काढता पाय घेणेच पसंत केले आहे.



यासोबतच परिसरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्धही गुन्हे दाखल केले जात आहेत.यापूर्वीही तलवार, खंजीर आदी धारदार शस्त्र बाळगणाऱ्यांवर गुन्हेदाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, तलवारीने केक कापणाऱ्यांविरुद्धही कारवाई केली जात आहे. थेट गुन्हे नोंदविले जात आहेत.काही महिन्यांपूर्वी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एकाकडून तलवार जप्त केली होती. त्यामुळे तलवारीने केक कापल्याचे आढळून आल्यास वाढदिवस थेट कोठडीतच साजरा करावा लागू शकतो, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

**रस्त्यावर वाढदिवस साजरा करणारेही रडारवर**

दुचाकीवर केक ठेवून रात्री उशिरा वाढदिवस साजरा करण्याचे प्रकारही वाढले आहेत. रात्री उशिरा रस्त्यावर वाढदिवस साजरा करणारेही आता पोलिसांच्या रडारवर आहेत.तलवारीने केक कापून ते फोटो शोशल मीडियावर शेअर करणार्यावर सायबर पोलीस लक्ष ठेवून आहेत.

# सुपर स्पेशालिटीत लवकरच कैदी रुग्णांसाठी स्वतंत्र वॉर्ड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

सुपर स्पेशालिटी रुग्णालयात लवकरच कैदी रुग्णांसाठी स्वतंत्र वार्ड सुरू होणार आहे. अनेक कैदी रुग्णांच्या विविध आजारांवर विशेषतः मूत्रपिंड, हृदयरोगावर येथे उपचार करावे लागतात. कोणाची अँजिओप्लास्टी करावी लागते. यानंतर त्यांना काही वेळ निरीक्षणात ठेवावे लागते. परंतु, आजवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांचा वॉर्डच नव्हता. कैदी रुग्णांना सामान्य रुग्णांसोबत ठेवता येत नसल्याने शासनाने कैदी रुग्णांसाठी स्वतंत्र वॉर्ड निर्मितीचे निर्देश दिले. त्या दृष्टीने आता तयारी सुरू झाल्याची माहिती सुपर स्पेशालिटीचे अधीक्षक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल.डॉ. अमोल नरोटे यांनी दिली. कैदी रुग्णांसाठी किमान २० खाटांचे रुग्णालय राहील. येथे त्यांच्या उपचारासह सुरक्षेची पूर्ण सोय असेल. मूत्रपिंड, हृदयावर शस्त्रक्रियेसाठी कॅथलॅब आली आहे. त्यामुळे येथे उपचाराच्या अद्ययावत सुविधा आहेत. कोणत्याही रुग्णाला मग ते कैदी रुग्ण असले तरी त्यांना अन्य महानगरांत पाठवण्याची गरज नाही.अमरावती शहरात एक हजारापेक्षा अधिक कैद्यांची क्षमता असलेले मध्यवर्ती कारागृह असून येथे विविध भागातील कैदी येतात.